परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२० ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०१९

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सस्नेह नमस्कार.***

सन २०१९ मधला डिसेंबर हितगुजचा हा शेवटचा अंक. सरत्या वर्षाला जड अंतःकरणाने निरोप द्यायचा आणि येणाऱ्या नव वर्षाचे आनंदाने, उत्साहाने स्वागत करायचे. मावळत्या दिनकराला अर्घ्य द्यायचे, अस्तास जाणाऱ्या सूर्याला निरोप द्यायचा. उद्या उगवणाराच म्हणून उगवत्या सूर्याला नमस्कार करून हात जोडायचे. उगवत्या सूर्याचे स्वागत करतो तसे येणाऱ्या २०२० सनाचे आनंदाने स्वागत करायचे. नवीन बेत, नवीन योजना, चांगले संकल्प मनाने करायचे, ते मनोगत सामर्थ्याने, मनोबलाने सिद्धीस न्यायचे. आपल्या सर्व कपिगोत्री परिवाराला येणारे नवीन वर्ष सुख समृद्धीचे, आरोग्यपूर्ण, मनोरथ पूर्ण करणारे जावो अशी शुभकामना व्यक्त करते असो.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'मासानां मार्गशीर्षोऽहम्,' असे मार्गशीर्ष महिन्याचे श्रेष्ठत्व सांगितेले आहे, आणि अशा मार्गशीर्ष महिन्यात हितगुज डिसेंबरचा अंक प्रकाशित होत आहे.

मर्गशीर्ष पोर्णिमेस दत्तजयंती आहे. म्हणून श्री एकनाथ महाराजकृत दत्त जन्माख्यान दिले आहे. गुरुनाथ मराठे यांनी करून दिलेला पुस्तक परिचय आस्वादक, सौ. शालिनी चक्रदेव यांचा ''संथ वाहते कृष्णा माई'' या लेखात सांगलीला पुराने कसे झोडपले आणि सांगलीकरांचे कसे हाल झाले, सांगली शहराची दैना कशी झाली याचे प्रत्ययकारी वर्णन, सौरभ मराठे लिखीत, महालक्ष्मी घागरी फुकणे या लेखातून मराठे कुटुंब देवीची सेवा करून परंपरा कशी जपतात यांचे दर्शन होते. 'पान्हा' ही उत्कट वात्सत्यकथा आहे. श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचा, 'माझी सांगलीविषयक पार्श्वभूमी' लेख माहितीपूर्ण, वाचनीय आहे. श्री. रघूवीर मराठे यांनी रंगविलेले कै. रामभाऊ जोशी यांचे व्यक्तीचित्र सजीव, प्रत्ययकारी आहे. श्री. सदाशिव मराठे, लिखीत 'एक अद्‌भूत प्रेमकहाणी' परिणामकारक उत्कट आहे. 'बोलकं अंगण' फारच छान नावाप्रमाणेच बोलकं आहे.

## हार्दिक निमंत्रण

**दरवर्षीप्रमाणे पुणे शाखेचा वर्धापन दिनाचा समारंभ रविवार दि. २६ जानेवारी २०२० रोजी सायंकाळी ५.०० ते ८.०० वाजेपर्यंत वेदशास्त्रोत्तेजक सभागृहात आयोजित करण्याचं ठरवले आहे. श्री अच्युत चक्रदेव यांनी लिहिलेल्या कैद्यांच्या जीवनावरील लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ, तसेच श्री. सतिशजी मराठे, रिझर्व्ह बँकेचे संचालक आणि संवादिनी वादक श्री प्रमोद मराठे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पुणे शाखा कार्यकारिणीची निवडणूक देखील होणार आहे. तरी सर्व कुलबांधवाना आग्रहाचं निमंत्रण आहे.**

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

आरोग्यं धनसंपदा, हसरे हितगुज, कुलबांधवांशी संवाद, सुविचार, सुगरणीचा सल्ला इ. सर्व मजकुर वाचनीय आहे असो.

पुणे येथे होणाऱ्या वर्धापनदिनाला जास्तीत जास्त कुलबांधवांनी यावे ही विनंती. सुनंदाताईची लिहिण्याची शैली ललित आहे. त्यांनी लिहित राहावं ही अपेक्षा. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक सुंदर लेखिका दडलेली आहे असे जाणवते. दिवंगत सासूबाईंच्या आठवणी अश्विनी या त्यांच्या सूनबाईने चांगल्या भावपूर्ण सांगितल्या आहेत.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २७ नोव्हेंबर २०१९)





# स्वाद आणि आरोग्याचा राजा टोमॅटो

- टोमॅटो चविष्ट असून, पाचक असते, पोटाच्या आजारांवर याचा प्रयोग ओषधीप्रमाणे केला जातो.
- जीव घाबरणे, कळपट ढेकर येणे, तोंडातील छाले, हिरड्यांच्या दुखण्यात टोमॅटोचे सूप, आलं आणि काळे मीठ घालून सेवन केल्याने लगेचच फायदा होतो.
- टोमॅटोच्या सूपामुळे शरीरात लवकरच स्फूर्ती येते. पोट हलकं राहतं.
- हिवाळ्यात गरमा गरम सूप प्यायल्याने सर्दीत आराम मिळतो.
- अपेंडिसाइटिस आणि शरीराची स्थूलतेत टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.
- रक्तदाबात याचा प्रयोग नियमित केल्याने आराम मिळतो.
- संधीवात आणि एक्जिमामध्ये याचे सेवन केल्याने आराम पडतो.
- आजारानंतर आलेला थकवा दूप करण्यासाठी टोमॅटो सर्वांत चांगला विकल्प आहे.
- मधुमेहाच्या रोगावर हा सर्वश्रेष्ठ पथ्य आहे.


## 'हितगुज'ला जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान रु.600/-, अर्धे पान रु.1200/-, पूर्ण पान रु.2500/- रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने संपादिकेच्या पत्त्यावर चेकने पाठवावी. किंवा IDBI बँक दादर (पश्चिम) शाखेतील बचत क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरा. वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहावा. अशा रीतीने पैसे भरल्यावर आपले नाव पत्ता, पैसे भरल्याचा दिनांक व कारण, भ्रमणध्वनी, रक्कम आदी माहिती info@marathepratishthan.org या ई-मेलवर कळवावी. म्हणजे पावती पाठविता येऊ शकेल.




**दत्तमय जग निर्गुण निरंकार। नाही भेदभाव अंतरीचा।।**
**काया वाचा मन दत्तरूप। तूची आधार जगतात।।**
**भिन्न स्वरूप भिन्न अवतार। परी एक नाम तारक।।**
**अवधूत दिगंबर नाम एक तारी। जगी या उद्धारी सर्वांश्रुत।।**

# संवाद कुलबांधवांशी

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

**म**राठे कुलबांधव-भगिनींनो, नमस्कार. मागील संवादामध्ये मी म्हटल्याप्रमाणे यंदा पावसाने देशावर मोठीच कृपा केल्याने काही भागात ओला दुष्काळ ओढवला मात्र काही भागात नेहमीच दुष्काळ असायचा तेथे मात्र पावसाने दिलासा दिला त्यामुळे तेथे लोक सुखावले. अगदी दिवाळी झाल्यानंतर देखील पाऊस पडतच राहिला. आता याला कारणे बरीच असतील परंतु हे सगळं नैसर्गिक आहे.

सप्टेंबरच्या अंकात आवाहन केल्याप्रमाणे घरगुती गणेश सजावट स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन केले होते त्याप्रमाणे आपल्या कुलबांधवाचा प्रतिसाद मिळाला व नेहमीप्रमाणे याचा वेळेवर निकाल जाहीर केला गेला. सदर निकाल याच अंकामध्ये दिला आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही स्पर्धा चांगल्या प्रकारे पार पडत आहे.

मंडळी, आपल्या परिवारामधे खूप वेगवेगळ्या क्षेत्रांत लोक काम करत आहेत, मात्र आपले लोक प्रसिद्धी पराङःमुख असल्याने बरेच जणांचे कार्य लोकांसमोर येत नाही. आम्ही आपणास आवाहन करत आहोत की आपण आपल्या क्षेत्रात करत असलेले कार्य लोकांसमोर येण्यासाठी आपण लिहिते व्हा. आपले लिखाण आपण 'हितगुज' मध्ये छपाईसाठी आवर्जून पाठवत रहा. वेळच्यावेळी ते छापले जाईल. जेणेकरून आपल्या कार्याची लोकांना माहिती होईल.

आपल्या परिवारामधील बरेचजण देश विदेश पर्यटन करत असतात, त्यांना असे आवाहन करतो की त्यांनी आवर्जून आपण करत असलेल्या पर्यटनावर लिहिते व्हा व हितगुज साठी पाठवत चला, आपले अनुभव वाचून इतरांना फिरण्याची इच्छा निर्माण होऊ शकते व त्यांना माहितीही मिळेल व त्याचा सर्वांना फायदाच होईल. याचबरोबर आपण जिथे जिथे जाल तिथल्या मराठे कुटुंबीयांची आवर्जून भेट घ्या व त्यांना आपल्या प्रतिष्ठान बद्दल, 'हितगुज'बद्दल माहिती द्या.

आपण जानेवारी २०१८ मध्ये बडोदा येथे ११ वे अ. भा. संमेलन घेतले होते. आता २०२० मध्ये संमेलन घेणे अपेक्षित आहे. आपण बहुतेक सर्वजण मुळचे कोकणातले. त्यामुळे कोकणातील रत्नागिरी वा सिंधुदुर्ग, खास करून सिंधुदुर्ग येथे संमेलन झाल्यास गोवा कर्नाटक येथील कुलबांधवांना देखील ते सोयीचे ठरेल. या दृष्टीने या दोन्ही जिल्ह्यातील कुलबांधवांनी पुढाकार घेऊन एक देखणे संमेलन आयोजित करावे. अशा संमेलनाचा प्रस्ताव आपल्याकडून येणे अपेक्षित आहे. आपल्या या प्रयत्नांना आमच्याकडून पूर्ण प्रतिसाद व सहकार्य मिळेल हा विश्वास बाळगावा आणि पुढे यावे.

आपण निधी उपलब्ध असल्यास, आपल्या संस्थेतर्फे परिवारातील तसेच परिवाराबाहेरील गरजूंना शैक्षणिक मदत करतो. याचबरोबर परिवारातील व्यक्तींना वैद्यकीय मदतही देतो. अपेक्षा हीच असते की जेव्हा आपणाला शक्य होईल तेव्हा त्यामध्ये भर घालून संस्थेला देणगी द्यावी म्हणजे संस्थेला निधी कमी पडणार नाही. तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी कोणत्या न कोणत्या कारणांने संस्थेला देणगी देत राहिल्यास संस्थेला निधीची कमतरता जाणवणार नाही. वाढदिवसाच्या निमित्ताने, विवाहदिनाच्या निमित्ताने आणखीही काही ना काही कारणाने शक्य असेल तेवढी देणगी देत राहिल्यास संस्थेचा निधी वाढेल व जास्त मदत करता येऊ शकेल.

आपणा सर्वांना हे अवगत आहेच की सध्या आपण कुलवृत्तांत अद्ययावतीकरणाचे कार्य करत आहोत, यासाठीचे software बनवण्याची प्रक्रिया सुरू आहे, १९९२ साली प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तान्तातील माहितीचे गठन करण्यासाठी Data Entry Softwareची चाचणी देखील झाली. परंतु काही तांत्रिक चुका दुरूस्त होणे बाकी आहे. ते झाले की लवकरच त्याची Data Entry सुरू होईल व अंदाजे ३ महिन्यात ती पूर्ण करता येईल. एकदा हे काम पूर्ण झाल्यावर त्यानंतरची आपली कौटुंबिक माहिती प्रत्येकास आपल्या marathepratishthan.org या website वर जाऊन नंतर भरता येणे शक्य होईल.

एक महत्त्वाचे आवाहन आपणास करत आहोत की आपणापैकी तसेच आपल्या परीवारामधील ज्या व्यक्ती सज्ञान होऊन कमवू लागल्या असतील त्यांनी मराठे प्रतिष्ठान व 'हितगुज'चे सभासदत्व घ्यावे जेणेकरून आपली सदस्य संख्या वाढेल व निधीही वाढेल तसेच आपण एकत्र येण्यास मदत होईल. मराठे प्रतिष्ठान चे सभासद शुल्क रु ५००/- व 'हितगुज'ची सभासद वर्गणी रु २०००/- आहे.

हा आपला 'हितगुज'चा 'डिसेंबर'चा अंक असल्याने आपण लवकरच २०२० मध्ये पदार्पण करणार आहोत, तेव्हा आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा, पुन्हा भेटूच मार्चमधे.

♦

# महालक्ष्मी (घागरी फुंकणे)

• सौरभ मराठे (पृ.३१६), पुणे भ्रमणध्वनी : ९८६०५६१११३

केवळ चित्पावन समाजामध्ये केले जाणारे हे एक अनोखे व्रत आहे. नवरात्रात येणाऱ्या अष्टमीला म्हणजेच आश्विन शुद्ध अष्टमीला श्री महालक्ष्मीचे पूजन करण्याची प्रथा आहे. सर्वच्या सर्व चित्पावनांकडे ही पूजा करण्याची प्रथा आहे असे नाही पण बहुतांश चित्पावन लोकांमध्ये ही पूजा केली जाते.

मंगलागौरीप्रमाणे विवाहापासून पाच वर्षे नववधूने हे व्रत करावयाचे असते. ह्या व्रताचे सोवळे अत्यंत कडक असते. गर्भवती महिलेने ह्या पूजेत सहभाग घ्यावयाचा नसतो तसेच सायंकाळी दर्शनाला येताना काळे कपडेही घालून येणे निषिद्ध मानले जाते.

अष्टमीच्या ह्या पूजनासाठी निशीथकाळ म्हणजेच रात्री साडेबारा ते दीड ह्या वेळेत अष्टमी असलेला दिवस घ्यावयाचा असतो. त्या दिवशी सकाळ-दुपार-सायंकाळी सप्तमी असू शकते. अशा सप्तमीवर सकाळची पूजा केली जाते व रात्रीचा महालक्ष्मीचा जागर/महालक्ष्मीची पूजा व घागरी फुंकण्याचा कार्यक्रम अष्टमीवर केला जातो.

सकाळच्या वेळेस देवीची यथासांग पूजा केली जाते. वाळूचे खडे ह्या पूजेसाठी वापरले जातात. विवाहाच्या/पूजेच्या वर्षांप्रमाणे खड्यांची संख्या घेतली जाते. पहिल्या वर्षी एक खडा... दुसऱ्या वर्षी दोन... असे करत पाचव्या वर्षी पाच खडे घेऊन देवीची पूजा केली जाते. गणपतीची पूजा करून मग ह्या खड्यांची पूजा करतात. ह्या वेळेस दुर्वांचा तातू आणि रेशमाचा तातू घेतात. जितके वर्ष असेल तितक्या गाठी रेशमाच्या तातूला मारल्या जातात. पंचामृती पूजा करून देवीला १६ अर्घ्य अर्पण केले जातात. वाळूच्या खड्यांबरोबर ह्या दोन्ही तातूंची पूजा केली जाते. पूजेनंतर रेशमाचा तातू मनगटावर बांधला जातो. हा तातू सायंकाळी महालक्ष्मी उभी केल्यावर तिच्या पायावर वाहायचा असतो.

पूजेनंतर महालक्ष्मीची आरती करतात आणि कहाणी वाचली जाते. दुपारच्या वेळेस पुरणपोळीच्या जेवणाचा नैवेद्य दाखवला जातो. तिन्ही सांजेच्या वेळेस, श्री महालक्ष्मी उभी केली जाते. लाकडाच्या/फायबरच्या सांगाड्यावर महालक्ष्मीचा मुखवटा बसवतात. काही लोकांकडे पिंप... हंडा...कळशी एकमेकांवर रचून देवीची मूर्ती तयार केली जाते. साधारण सव्वा किलोच्या तांदळाच्या पिठाची उकड काढून देवीचा मुखवटा केला जातो. ह्या मुखवट्याला काजळी, कुंकू वापरून रंगवले जाते आणि मूर्तीवर स्थापन केला जातो. नानाविध दागिन्यांनी देवीला सजवले जाते.

महालक्ष्मीचा मुखवटा हा पुरुषाने बनवायचा असतो आणि तो पूर्ण होईपर्यंत कोणीही बघायचा नसतो. एकदा मुखवटा बसवून देवीची स्थापना झाली की तिची यथासांग पूजा केली जाते. फळांनी, नारळाने तिची ओटी भरली जाते. देवीच्या शेजारी शंकराचीही स्थापना केली जाते. देवीसमोर धान्याच्या राशी, त्यावर गोविंद विडे, फराळाचे अनेक पदार्थ मांडले जातात. त्यानंतर घागरी फुंकण्याचा कार्यक्रम केला जातो. मातीच्या/तांबा, पितळ्याच्या घागरी धूपवून त्या देवीसमोर फुंकल्या जातात. सकाळी पूजा केलेल्या वाशिळ्यांनी सायंकाळी ह्या स्थापन केलेल्या महालक्ष्मीसमोर मनगटावर बांधलेला तातू वाहून पाच घागरी फुंकायच्या असतात. देवीची गाणी/भजन/गोफ धरून रात्रभर देवीचा जागर केला जातो. दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकावर गोमूत्र शिंपडले जाते. रात्री बारा वाजता देवीची आरती करून घागर फुंकण्याच्या कार्यक्रमाची सांगता होते. पहाटे प्रहर बदलल्यानंतर देवीच्या मुखवट्याचे, विसर्जन नदीत केले जाते.

पूर्वी अनेक घरांमध्ये हा उत्सव साजरा केला जात असे. आजकाल तो सार्वजनिक ठिकाणी साजरा केला जात आहे. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या उत्सवात कुठेतरी मूळ परंपरा विसरली जात आहे असे लक्षात येऊ लागले. तसेच सोवळेही पाळले जात नाही असेही दिसल्यावर आम्ही २०१५ पासून हा उत्सव त्याच्या मूळ स्वरूपात साजरा करू लागलो, आपली प्रथा आपणच जपली पाहिजे ह्या उद्देशांनी हा उत्सव आम्ही सुरू केला किंबहुना तसा प्रयत्न केला. पुण्यात कर्वे रस्त्यावर अंबर हॉलच्या सहकार्याने ३ वेळा हा उत्सव साजरा करता येऊ शकला. ह्यावर्षी साधारण ३५ मुलींनी सकाळच्या पूजेत सहभाग नोंदवला तसेच सायंकाळी साधारण ७०० लोकांनी देवीचे दर्शन घेतले.

शक्य आहे तोपर्यंत अशीच देवीची सेवा करून आपली परंपरा जपण्याचा आम्हा मराठे कुटुंबाचा मानस आहे.

शेवटी ही सर्व श्रींची इच्छा.

♦

# पान्हा

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा    दूरध्वनी : ०२२ २४१५०८८९

शुभदेच्या पोटात दुखू लागले आणि कमरेतून बारीक कळा येऊ लागल्या तशी ती अस्वस्थ झाली. तिने अंदाज केला की, बाळंत व्हायची वेळ जवळ आली असावी. तिने घड्याळात पाहिले, रात्रीचे दोन वाजले होते. आईला शांत झोप लागली होती. शुभदेला आईला उठवावेसे वाटेना. तशीच ती पडून राहिली पण पुन्हा तिच्या पोटात दुखू लागले.

...आज सकाळीच तिच्या अंगावरून जाऊ लागले होते म्हणून ती हॉस्पिटलात जाऊन तपासून आली होती. डॉक्टरीण बाईंनी घर जवळच आहे म्हणून ॲडमिट करून घेतले नव्हते इतकेच, पण लवकरच बाळ होण्याची शक्यता सांगितली होती. घरी आल्यावर आई म्हणाली सुद्धा, 'अग, शुभा ओले बाळंतपण चांगले असते, आता तुला जास्त त्रास होणार नाही बघ.'

...आईच्या या बोलण्याने शुभदेला थोडा धीर आला होता. शुभदा पहिलटकरीण होती. मनातून थोडीशी धास्तावली होती; पण तितकीच सोशिक होती. कळा असह्य झाल्यावर तिने आईला उठविले. आईने, शुभदेच्या वडिलांना ताबडतोब टॅक्सी आणायला सांगितले. शुभदेच्या वडिलांना टेन्शन आल्यासारखे झाले पण क्षणभरच. त्यांनी झटकन कपडे केले आणि ते टॅक्सी आणायला गेले. शुभदाच्या आईने कपड्यांची पिशवी, पर्स बरोबर घेऊन निघण्याची तयारी केली. शुभदाला देवापुढे नारळ ठेवायला दिला. शुभदाने नारळ ठेवून, या बाळंतपणातून सुखरूपपणे सुटका करण्याची देवाजवळ मनोभावे प्रार्थना केली. तशाही जडावलेल्या अवस्थेत आईला वाकून नमस्कार करून तिचा प्रेमळ शुभ आशीर्वाद घेतला. आई आणि वडील ही शुभदाची श्रद्धास्थाने होती. इतक्यात तिचे वडील टॅक्सी घेऊन आलेही.

...हॉस्पिटलच्या पायऱ्या शुभदा जडपावलांनी कशाबशा चढली. नर्सने तिला तपासले आणि अगदी योग्य वेळी हॉस्पिटलात आल्याचे सांगून, बाळंतपणाच्या आधीचे आवश्यक ते सोपस्कर केले.

समुद्रात लाटा कशा एकापाठोपाठ एक येत राहातात तशा कळा शुभदेला येऊ लागल्या. असह्य प्रसूतिवेदनांनी शुभदेला जीव अगदी नकोसा केला. क्षणभरच तिच्या डोळ्यापुढे काळोखी आली. ती तिचे अस्तित्वच विसरली आणि शुद्धीवर आली ती एकदम बाळाच्या रडण्याने. 'आई' झाल्याचे तिला भान आले.

...ज्या क्षणाची ती खूप आतुरतेने वाट पहात होती, ज्या क्षणाची तिला खूप ओढ लागली होती तो निर्मितीचा क्षण जवळ येऊन ठेपला होता, पण प्रत्यक्षात तो तिला कळलाच नाही. तिला वाटले निर्मितीचा क्षण असा चिमटीत पकडता येत नाही.

शुभदा खूप थकली होती पण 'आई' झाल्यामुळे एक आगळीच तृप्ती, धन्यता ती अनुभवीत होती. देवाचे तिने आभार मानले. त्याच्याविषयी मनोमन कृतज्ञतेची भावना दाटून आली. शुभदेच्या नैसर्गिक, सुखरूप सुटकेमुळे तिच्या आई-वडिलांनाही खूप समाधान वाटले. तिच्या वडिलांनी लगेच फोन करून सासरी ही आनंदाची बातमी सांगितली.

...त्या दोघा पति-पत्नींना पाहिजे होती ती 'मनोवांछित संतती' झाली होती.

...सकाळी सतीश आला. बाळाच्या आगमनाचे स्वागत त्याच्या चेहऱ्यावरून नुसते ओसंडून वहात होते. अपार प्रेमाने त्याने शुभदेचा हात कुरवाळला, फुलपाखराने फुलावर अलगद बसावे तसे तिच्या ओठांवर आपले ओठ ठेवले. शुभदेचा नाजूकपणा सांभाळून प्रणय करण्याची त्याची रीत होती. मुलाचा बाप झाल्याचे कर्तृत्व त्याच्या वागण्या-बोलण्यातून, हालचालीतून व्यक्त होत होते.

मातृत्वाचा हा अनोखा अनुभव तिला परिपूर्तीचे सुख देत होता. तिच्या कुशीत विसावलेल्या तान्हुल्याकडे ती टक लावून पाहात होती. 'बाळा होऊ कशी उतराई, तुझ्यामुळे मी झाले आई' या गीताच्या ओळी तिच्या मनात सारख्या रुंजी घालीत होत्या.

...आणि जेव्हा शुभदाने पहिल्यांदा बाळाला पाजायला घेतले तेव्हा दूध कसे प्यायचे तेच बेट्याला कळत नव्हते. शुभदाला खूप गंमत वाटली. तिने बाळाचे इवलेसे मुख स्तनाला लावले आणि मग तो हळूहळू दूध ओढू लागला. बाळाला अंगावर पाजताना शुभदाला खूप धन्य वाटायचे. मातृत्वाचा आनंद तिला यावेळी व्हायचा. बाळ दूध पिऊ लागला की तिला आपण आई आहोत याचा अभिमान वाटायचा. आपल्या स्त्रीत्वाचे सार्थक झाले असे जाणवायचे. तान्हुल्याचे चिमणे

तोंड तिच्या उराला लागायचा अवकाश की शुभदाचे वात्सल्य उफाळून यायचे आणि तिला पान्हा फुटायचा. त्यामुळे बाळाची भूक वाढू लागली तरी त्याला अंगावरचे दूध पोटभर मिळून बाहेरचे दूध पाजण्याची वेळच आली नाही.

...बाळ-बाळंतिणीचे कोडकौतुक अगदी विचारूच नका, असे चालले होते. बाळ बाळसे धरू लागले होते. डिंकाचे लाडू, अळिवाचे लाडू, खसखशीची खीर आणि घरचे दूध-तूप यामुळे शुभदालाही बाळंतपण मानवले होते.

...वेलीला कोंब फुटल्यावर वेल जशी टवटवीत ताजी दिसावी तशी शुभदा दिसत होती. तेल-हळद अंगाला लावून तिची केतकी कांती सोनचाफ्याच्या पाकळीसारखी झळाळत होती.

अपत्यप्राप्ती आणि बाळाला अंगावर पाजणे हे शुभदाचे सुखनिधान होते. मातृत्व म्हणजे मानवी अस्तित्वातील सत्याकडे पाहण्याची ती एक दृष्टी आहे, अशी तिची धारणा होती. बाळाला स्तनपान मातेचे आद्यकर्तव्य ती मानीत होती. वैद्यकशास्त्र सांगते की पहिले सहा महिने बाळाला केवळ स्तनपान पुरेसे होते. बाळाच्या वाढीसाठी आवश्यक ते सर्व घटक योग्य त्या प्रमाणात मातेच्या दुधातून मिळतात. बाळाची प्रतिकारशक्ती वाढते. बाहेरचा कोणताही आहार देण्याची गरज नसते. आईच्या दुधाला पर्याय नाही, इ. उपयुक्त माहिती शुभदाने आई होण्याआधीच पुस्तकांमधून वाचली होती.

...त्यादिवशी बाळाला पाजून झाल्यावर बाळ नेहमीसारखा तृप्तेने झोपला म्हणून तिने त्याला हलकेच पाळण्यात ठेवले आणि तीही विश्रांतीसाठी झोपली. पण अचानक काय झाले कोणास ठाऊक, तिला कडकडून ताप भरला. तिची छातीही गच्च, जड दगडासारखी झाली. ती विलक्षण अस्वस्थ होऊन एकदम जागी झाली. बाळाचे ओले दुपटे वाळत घालण्यासाठी तिने हात वर केला मात्र, तोच जीवघेणी कळ तिच्या छातीतून आली. तिला हात काही वर करता येईना. छातीत जबरदस्त ठणका सुरू झाला. तिच्या आईने फोन करून डॉक्टरीणबाईंची ताबडतोब अपॉइंटमेंट घेतली. त्यांनी शुभदाला व्यवस्थित तपासून छातीत दुधाच्या गाठी झाल्या आहेत. त्यामुळे छाती फार दुखते, असे सांगितले. त्यावर उपाय म्हणजे दूध थांबविण्याच्या औषधांच्या गोळ्या घेणे हा होय, असे सांगितले. डॉक्टरीणबाईंनी कागदावर झरझर गोळ्यांची नावे लिहून दिली, आणि त्या कशा घ्यायच्या हे तिला समजावून सांगितले. बाळाला अंगावर अजिबात पाजू नका असे बजावले. तसेच, बाहेरचे दूध लावा असे सांगितले.

...शुभदेला फार वाईट वाटले. स्वतःच्या दुखण्यामुळे नव्हे, तर बाळाला पाजू नका सांगितले म्हणून. ती उदासपणे घरी आली. बाळ भुकेमुळे व्याकूळ होऊन टाहो फोडून टॅहॅऽऽटॅहॅ रडत होते. शुभदा नेहमीच्या सवयीने पटकन् त्याला पदराखाली घेणार होती पण तिला डॉक्टरीणबाईंनी स्पष्ट दिलेली ताकीद आठवली. तिने मनावर धोंडा ठेवला. शुभदाच्या आईने बाहेरच्या दुधाने भरलेली बाटली आणून बाळाला प्यायला दिली. पण या नवीन वस्तूमुळे बाळ गोंधळले. ते काही केल्या बाटलीला तोंडच लावेना. लावले तरी बुचाशी चाळा केल्यासारखे खेळू लागायचे. शेवटी त्याची भूक पराकोटीला गेल्यानंतर आणि या मायलेकींनी खटपट केल्यानंतर कसेबसे तो दूध बाटलीतून ओढू लागला. थोड्याच वेळात ते दूध ते बाहेर ओकून काढू लागला. अमृताची सर थोडीच या बाहेरच्या दुधाला येणार होती?

शुभदा व्यथित झाली. बाळ भुकेने रडते आहे आणि आपण 'काही' करू शकत नाही हे तिला साहवेना. बाळाला थोपटून, आंजारून-गोंजारून तिने कसेबसे झोपविले. दूध पिण्याचे तंत्र अचानक बदलल्यामुळे बाळ अस्वस्थ होत होते. सारखे कुरकुरत होते बिचारे. त्याचे म्लान मुखकमल पाहून शुभदाला फार वाईट वाटत होते. त्याचे खपाटी केलेले पोट तिला बघवेना. तिची आई म्हणालीही, 'चांगली बाळसे धरत होते सोनुले, पार सुकून गेले एखाद्या फुलासारखे!'

...शुभदाही बाळाला पाजण्याचा नाइलाज झाला म्हणून तळमळत होती. दुःखात वितळणाऱ्या रात्री तिला अस्वस्थ करीत होत्या. बाळ-बाळंतिणीचे स्वास्थ्य या प्रकाराने एकदम बिघडून जाऊन धोक्यात आले होते. तिला वाटले, ...माणसाच्या जीवनात काय घडावे किंवा घडू नये, हे ठरविणे माणसाच्या हाती नाही. काही गोष्टी माणसाच्या हातात असतात हे खरे, पण सगळ्याच गोष्टी त्याच्या हाती नसतात. जे प्रयत्नांती घडते किंवा घडू शकते त्यावर आपली सत्ता असते; पण जे अपवादाने किंवा योगायोगाने घडते, ते माणसाच्या आवाक्याबाहेर राहाते. नाहीतर, बाळंतीण ममतेच्या, वात्सल्याच्या रसात न्हाऊन निघत असताना ही दुधाची गाठ एखाद्या वैरिणीसारखी का निपजावी?

...असे तिचे विचारचक्र चालू असतानाच तिचे लक्ष सहजच खिडकीच्या वळचणीकडे गेले. तेथे एक चिमणी तिच्या पिलाला छोटासा दाण्याचा कण अचूक भरवीत होती. पक्षिणीचे पिलाला हे हळुवारपणे चोचीतून भरविण्याचे दृश्य पाहण्यात शुभा गढून गेली इतकी की आईने मारलेली हाकही तिला ऐकू आली नाही.

पूर्वी बाळ झोपल्यावर त्याचा तृप्त, शांत चेहरा शुभदा निरखीत असे आणि त्यामुळे सुखावत असे. पण आता बाळाचे हाल दुधासाठी. ते व्याकूळ, केविलवाणे रडणे ऐकून शुभदाचे

आतडे पिळवटून जाई.

...परवा तर तान्हुल्याने कहरच केला. रडून-रडून आकांत केला. उपाशीपोटी तो चिडचिड करू लागला. शुभदाला काही सुचेनासे झाले. आपला पोटचा गोळा भुकेने रडतो आहे आणि आपण जन्मदाती आई काही करू शकत नाही. ही हतबल अवस्था तिला आता सहन होण्याच्या पलीकडे गेली. बस्स झाली ही उपासमार! तिने डॉक्टरीणबाईंची लागलीच भेट घेतली आणि स्पष्ट सांगितले, 'बाळाला अंगावर पाजणे मी बंद करणार नाही, त्याचे दूध तोडणार नाही. यावर दुसरा काही तोडगा नाही का? आणखी काही इलाज उपाय नाही का? येणारे दूध असे अडवायचे? रोकायचे? फुटलेला पान्हा असा का आटवायचा? तिच्यातले वात्सल्य उफाळून आले. 'दूध थांबविण्याच्या गोळ्या मी घेणार नाही,' असे ठामपणे सांगून तिने टर्रकन् गोळ्यांचा कागद रागाने फाडून टाकला.

...डॉक्टरीणबाईंना शुभदेची ही घालमेल समजली. तिची तगमग, तळमळ थांबविण्यासाठी त्यांनी तिला शांतपणे ऑपरेशन करून दुधाची गाठ काढून टाकावी लागेल, तुम्हाला याचा फार त्रास होईल, जखम भरून यायला पुष्कळ वेळ लागेल आणि पुन्हा ड्रेसिंग करण्यासाठी रोज हॉस्पिटलात यावे लागेल. हा कठीण उपाय आहे, असे सांगितले.

'पण यानंतर बाळाला दूध पाजता येईल ना? बाळ दूध पिऊ शकेल ना?' असा प्रश्न शुभदाने अधीरतेने डॉक्टरीणबाईंना विचारला. त्यावर त्यांनी अगदी लगेचच म्हणजे ऑपरेशन झाल्यानंतर चारच तासांनी बाळ बिनधास्तपणे दूध पिऊ शकेल याची ग्वाही तिला दिली.

...शुभदा आनंदाने ऑपरेशनला तयार झाली. ऑपरेशन यशस्वी झाले. बंदुकीची गोळी काढावी तशी तिची दुधाची गाठ काढली गेली. जखम झाल्यामुळे शुभदाला दुखत फार होते. पण बाळाला पाजायला मिळणार या भावनिक आनंदाने या शारीरिक वेदनांचा तिला विसर पडला.

सोशिकतेच्या बाबतीत ती आता पृथ्वी झाली होती. तर वात्सल्याच्या बाबतीत आभाळ! तिला तान्ह्या बाळाला घरी ठेवून गडावर दुधाचा रतीब घालायला गेलेल्या शूर, साहसी, प्रेमळ हिरकणीची प्रकर्षाने आठवण झाली.

...आणि शुभदाने बाळाला जेव्हा पदराखाली घेतले तेव्हा तिला अवर्णनीय असे वात्सल्यसुख मिळाले. विश्वातील सर्व सुखं या सुखापुढे ओवाळून टाकावीत. आणि शुभदाला अशी अनुनभूती झाली की मातृत्वाचं माधुर्य माझ्या सर्वांगाला वेढून राहिलंय. त्या चिमुकल्या स्पर्शानं हा वात्सल्यघट ओसंडतो आहे, आणि तिला एक कविता आठवली:

*'त्या गुलाबी गोबऱ्या मुखात,*
*तो जीवनरस भरभरून दिला जातो.*
*माझाच जीवनरस, पण आता*
*वात्सल्यानं शुद्ध झालेला*
*त्यातील रक्तलालिमा नष्ट झालेला*
*माझ्या लाडक्या बाळा,*
*माझ्या दुधातील सारे दोष पचवून*
*तू पूर्णपणे उमलावस*
*एवढीच तर माझी प्रार्थना.'*

...आता सृष्टीतील प्रत्येक वस्तू शुभदाला तिच्या तान्ह्या बाळाप्रमाणे मोहक वाटू लागली. ♦

## सहवेदना



आपल्या मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचे खजिनदार गजाननराव यांच्या मातोश्री कै. सुशिलाताई मराठे (पृ.१२९) यांचे दि.०६.११.२०१९ रोजी वृद्धापकाळामुळे वयाच्या ९१व्या वर्षी दुःखद निधन झाले 'मराठे प्रतिष्ठान'च्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो! मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेच्या वर्धापनदिनी त्यांची आवर्जून उपस्थिती असे. गेल्या वर्षी वयाच्या ९०व्या वर्षीही त्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या हे लक्षणीय आहे. यावर्षी त्या नसणार याचे दुःख वाटते. असो.

## आम्ही म्हातारे

म्हातारपण म्हणजे वार्धक्य. परावलंबी जीवन वाट्याला येण्याची शक्यता-उपेक्षा-अवहेलना-अपमान-आयुष्यातला कठीण काळ-'बाळवयी खेळी रमलो' तारुण्य नासले वृद्धपणी देवा आता दिसे पैलतीर' अशी अवस्था म्हणजे म्हातारपण. ज्येष्ठ नागरिक म्हणून मान-प्रतिष्ठा काही भाग्यवंतांना मिळते. उरलो आशीर्वादापुरता-उरलो सत्कारापुरता असेही भाग्य, घरात-कुटुंबात त्यांना मानाचे स्थान, आदर मिळतो.

अशा वार्धक्यातील तुमच्या आठवणी, आनंदी, गोड, कटू, चांगला वा वाईट असे प्रसंग, एखादी घटना किंवा गोष्ट सांगा आपल्या कुलबांधवांना.

कागद-पेन घ्या, लिहा आणि पाठवा आपल्या हितगुजकडे किंवा ई-मेलने hitguj@marathepratishthan.org वर. म्हातारपणातले अनुभव लिहायला वेळ-काळाचे बंधन नाही.

**– संपादिका हितगुज**

# पुस्तक-परिचय मनाचा ठाव घेणाऱ्या कथा 'गर्द सभोवती'

• श्री. गुरुनाथ मराठे (पृ. ४०८), बोरीवली भ्रमणध्वनी : ९९६९३८८४३४

**आ**शालता वाबगावकर यांची प्रतिथयश अभिनेत्री आणि गोड गळ्याच्या सुरेल गायिका अशी ओळख आहे. त्यांची 'गर्द सभोवती, रान साजणी', 'जन्म दिला मज ज्यांनी' आणि 'रविकिरणांची झारी' अशी अनेक गीतं गाजली. पण लेखन हे त्यांचे वेगळं क्षेत्र रसिकांना अज्ञात आहे. आशालताताईंना वाचनाचं महत्त्व शाळेतल्या कर्णिक बाईंनी पटवून दिलं आणि त्यांना वाचनाचं वेड लागलं. चांदोबा, अमृत, कथा, कादंबरी अगदी अर्नाळकरसुद्धा आवडायला लागले. जरी वाचनाचं वेड लागलं असलं तरी, त्या लेखिका होतील असं त्यांना स्वप्नातही वाटलं नव्हतं.




आज त्या जवळजवळ ११ वर्षं अविरत लिहीत आहेत. त्यांच्या लेखनाचं वैशिष्ट्य म्हणजे साधे, सोपे विषय आणि ओघवती भाषाशैली. आशालताताईंचा लेखन हा सुप्त गुण आहे. त्यांच्या लेखनशैलीला दाद द्यावी, तेवढी कमीच आहे. मला मनापासून आवडलेलं त्यांचं पुस्तक म्हणजे 'गर्द सभोवती'. यात त्यांनी एकंदर ६७ छोट्या-छोट्या कथा लिहिल्या आहेत. त्या वाचल्यानंतर बराच काळ मनात रेंगाळत राहतात. वाचकांनी हे पुस्तक जरूर वाचावं. या पुस्तकातील पहिली कथा आहे 'काचेच्या बांगड्या'. त्या जेव्हा मे महिन्याच्या सुट्टीत गावाला जायच्या, तेव्हा काचेच्या रंगीबेरंगी बांगड्या घेऊन कासार यायचा. आशालताताई त्या बांगड्यांवरून हात फिरवायच्या आणि हरखून जायच्या. हिरवा चुडा भरलेली सुवासिनी बांगड्यांच्या किणकिण आवाजावरून ओळखली जायची. पण कालपरत्वे हातात बांगड्या घालायची फॅशन आऊटडेटेड झाली आणि त्यांची जागा ब्रेसलेटने घेतली. पण पुन्हा काळ बदलला आणि बांगड्यांची संस्कृती लोप पावली की काय, असं वाटत असतानाच दुकानात बांगड्या घेण्यासाठी गर्दी दिसू लागली.

'देव भाबडा माळी' ही दुसरी कथा आहे. एकदा लेखिका पुण्याला फुलांचं प्रदर्शन बघायला गेल्या होत्या. त्यांना लहानपणापासून केसात फुलं माळण्याची हौस होती. त्या गजरा घालून कुठे गेल्या की, आजूबाजूच्या बायका म्हणायच्या, 'काय छान घमघमाट सुटलाय हो'. प्रदर्शनात फिरताना गुलाबांच्या फुलांनी त्यांचं लक्ष वेधलं. लाल, पिवळा, गुलाबी आणि पांढरा असे विविध रंगांचे गुलाब तिथं होते. त्याशिवाय तिथं सोनचाफा, हिरवाचाफा, कवठीचाफा, नागचाफा असे विविध चाफ्याचे प्रकार होते. विलायती फुलंसुद्धा होती. या फुलांचे आभार कसे मानायचे? मुळात फुलांचे आभार मानायचे की फुलं निर्माण करणाऱ्यांचे? त्या ठिकाणी त्यांनीच गायलेलं आणि रमेश अणावकरांनी लिहिलेलं गीत त्यांना आठवलं. ते म्हणजे, 'रविकिरणांची झारी, घेऊनि सकाळी, बाग शिंपितो सोनेरी, देव भाबडा माळी'.

'लय' ही तिसरी कथा आहे. आपण जन्माला येतो, तेव्हा आपल्याबरोबर लय येते. बाळ जन्माला आल्याबरोबरच रडतं. त्याची लय आईच्या कानात जन्मभर गुंजत राहते. बाळ मोठं होताना, त्याच्या हसण्यात, रडण्यात, चालण्यात, धावण्यात, पडण्यात, मस्ती करण्यात, अशा सगळ्यात लय असते. त्यावर त्यांनी एक कथा लिहिली आहे. या पुस्तकातील 'शाळकरी मुलगा', 'टेक इट इझी' आणि 'जमाडी जम्मत' या सर्व कथा मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत.

♦

## हसरे हितगुज


**बायको :** आज दुपारच्या जेवणासाठी मी एक पनीरची मस्त भाजी बनवणार आहे.
दुपारी जेवायला बसल्यावर...

**नवरा :** अगं, तू म्हणाली होतीस पनीरची मस्त भाजी आहे. पण, यात तर पनीर शोधूनही सापडत नाहीय.

**बायको :** मुकाट्यानं जेवा. भाजीचं नावच आहे 'खोया पनीर'.

# श्रीदत्तात्रेय जन्माख्यान : संत एकनाथ महाराज रचित

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी : ०२२ २४१५०८८९



**महाराष्ट्रातील एक प्रमुख उपासना म्हणजे दत्तोपासना. महाराष्ट्रात घरोघरी दत्ताची उपासना होताना आढळते. गुरुवारी श्रीदत्तात्रेयांच्या भजनाचा, उपासनेचा कार्यक्रम नेहमी होत असताना दिसतो. ''तीन शिरे सहा हात तया माझा दंडवत'' अशा थाटात श्रीदत्तात्रेयांची अनेक सुबक व रंगीत प्रकाशचित्रे घरोघरी दिसतात. श्रीगुरुदेवदत्त अशा गुरुतत्त्वाचा आविष्कार त्यांच्या रूपात पाहावयास मिळतो.**

**दि. ११ डिसेंबर २०१९ ला मार्गशीर्ष पौर्णिमेस श्रीदत्तजयंती आहे. त्यानिमित्ताने संत एकनाथ महाराजकृत, श्रीदत्तात्रेय जन्माख्यान हा लेख सादर करीत आहोत – संपादिका.**

श्रीएकनाथ महाराजांनी ६७ ओव्यांमध्ये 'श्रीदत्तात्रेय जन्म' हे आख्यान रचले आहे. या आख्यानाचा प्रारंभ असा –

ऐका दत्तात्रय–आख्यान।
पार्वतीस सांगे त्रिलोचन।।

याप्रमाणे प्रारंभीच कथाविषय स्पष्ट करून शिव–पार्वतीच्या संवादातून हे आख्यान त्यांनी कथन केले आहे. पार्वती शिवाला म्हणते –

आम्हा तिघीवरती त्रिभुवनी।
श्रेष्ठ कोणी असेना ।।२।।

ही पार्वतीची गर्वोक्ती ऐकल्यावर शंकराने पार्वतीला 'सतिमहिमा' विशद करण्याचे कार्य नारदावर सोपविले. नारद पार्वतीला म्हणतात –

ऐकें पार्वती चित्त देऊनी।
अनुसूया अत्री पत्नी।
तुम्हां तिघीहुनी पतिव्रता।।६।।
तुम्हां तिघींचे पुतळे करूनी।
बांधले असे वामचरणीं।
असंख्य सामर्थ्य त्रिभुवनीं।
समतुल्य कोणी असेना।।७।।

याप्रमाणे सती अनुसूयेची श्रेष्ठता दाखवून नारदांनी पार्वतीचा अहंकार चांगलाच जागृत केला आहे. नारदाला ती यावर उपाय विचारते, तेव्हा नारद तिला सुचवितात की, शंकराची प्रार्थना करून त्याला अनुसूयेकडे पाठवावे आणि तिचे सत्त्वहरण करावे. याप्रमाणे कळ लावून नारद वैकुंठ गाठतात. वैकुंठात नारदाने लक्ष्मीला सती–अनुसूयेची महती सांगितल्यावर पार्वतीप्रमाणेच तीही दु:खीकष्टी बनते, तिचा गर्व उफाळून वर येतो.

ऐकोनि तटस्थ झाली रमा।
आता काय करूं पुरुषोत्तमा।
मजहुनी वाढ ऐसी सीमा।
ते कैसोनि निरसेल ।।१३।।

नारद तिलाही पूर्वीप्रमाणेच सल्ला देतात. श्रीविष्णूला अनुसूयेकडे पाठवावे आणि तिचे सत्त्वहरण करावे. मग नारद आपला मोर्चा सावित्रीकडे वळवितात. सावित्रीही गर्वाने फुगून म्हणते,

पाहतां आम्हापासूनि।
एवढी काय तिची स्थिती।
टिटवी काय समुद्राप्रती।
शोखूं शके।।१८।।

पतीच्या कर्तृत्वाचा अभिमान पत्नीने बाळगावा या न्यायाने सत्यवतीचा हा अहंकार स्त्री–स्वभाव–सुलभच वाटतो. टिटवी आणि समुद्राचा या संदर्भातील दृष्टांतही अत्यंत समर्पक वाटतो. शेवटी सत्यवतीही नारदाला उपाय काय विचारते. नारदही तिला लक्ष्मी आणि पार्वती या दोघींना सुचविलेला उपाय सांगून आपले कार्य साधून निघून जातात.

नारद गेल्यानंतर तिघीही आपापल्या पतीला प्रार्थना करतात आणि त्यांना अनुसूयेची परीक्षा पाहण्यासाठी, सत्त्वहरण करण्यासाठी सक्ती करतात.

मग पवन वेगे ते अवसरी।
तिघे प्रवेशले आश्रमाभीतरी।
वाहने ठेवुनिया दुरी।
माध्यान्हकाळी पै आले।।२५।।

यांप्रमाणे वायुवेगाने तिन्ही देव अत्री ऋषींच्या आश्रमात आले. देव आश्रमात येताच अत्रिऋषीने अनुसूयेला त्वरित बाहेर बोलावून तिघांचे यथासांग पूजन केले आणि आगमनाचे कारण विचारले तेव्हा तिन्ही देव म्हणतात

ते म्हण अनुसूयेसी।
तू पतिव्रतेमाजी श्रेष्ठ म्हणविसी। (अभंग ३४१३)
तरी मागतो ते देई आम्हांसी।
म्हणोनि भाके सी गोविले।।२९।।

त्यांच्या येण्याचा हेतू ऐकिल्यावर अनुसूयेने केलेले त्यावरचे भाष्य मोठे लक्षणीय आहे.

तुमचे देणे त्रिजगती।
आणि तुम्ही मागता मजप्रती।।३०।।

त्रिजगताला देणे देणाऱ्याने याचक बनून अनुसूयेकडे यावे यातील विरोधाभास एकनाथांनी मोठ्या कुशलतेने टिपला आहे. तरीही इच्छा जशी असेल तशी मागणी करण्याची विनंती अनुसूया करते तेव्हा देव म्हणतात –

देव म्हणती होऊनि नग्न।
आम्हांसी घालावे भोजन।।३१।।

इतकी विकृत आणि महाभयंकर मागणी देवांनी केली असता अनुसूया क्षणभरही विचारमग्न वा विचलित होत नाही. तर तिने ती विचित्र मागणी तत्काळ मान्य केली आहे. यातून अनुसूयेच्या सतिश्रेष्ठत्वाची साक्ष पटून पुढील कथाभाग एकदम चमत्काराच्या आणि अद्‌भुततेच्या दैवी पातळीवर जातो. त्यामुळे भाविक श्रोत्यांच्या मनात भक्तिभावनेचा उद्रेक होतो. अनुसूया नग्न होऊन त्यांना भिक्षा घालणार तोच सतीच्या पतिव्रत्याच्या महिम्यामुळे चमत्कार घडतो!

ठेवूनियां तिघांचे मस्तकी कर।
तंव ते तिघे झाले कुमर।
मग नग्न होऊनि सत्वर।
करवी स्तनपान तयांतें।।३२।।

बाळरूपात आलेल्या ब्रह्मा-विष्णू-महेशांची याप्रमाणे उदरतृप्ती करून 'वसन नेसली शीघ्रगती' असे वर्णन करून एकनाथांनी प्रस्तुत प्रसंग त्वरेने गुंडाळून टाकला आहे. कदाचित नाथांच्या संस्कारक्षम, भक्तिप्रवण मनाला या ठिकाणीची अश्लीलता जाणवली असावी. कदाचित या वर्णनामुळे श्रोत्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होईल, असेही त्यांना वाटले असावे! भविष्य पुराणात याप्रसंगी वर्णिले जात असलेले अत्यंत अश्लील वर्णन नाथांनी पूर्णपणे वगळून टाकले आहे, हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. एकनाथ हे सुसंस्कृत मनाचे संत होते, सुसंस्कृत भक्त होते तसेच कवीही!

पुढील प्रसंगचित्रणात नाथांनी, तिन्ही देवांनी केलेल्या जगतोद्धाराची महती गायिलेली आहे. आणि अनुसूयेच्या सतीत्वाचा महिमाही वर्णिला आहे. अनुसूया प्रथम ब्रह्माला पाळण्यात घालून म्हणते,

मग म्हणे चतुरानना।
जो जो जो रे सगुणा।
उत्पन्न करूनि त्रिभुवना।
बहु श्रम पावलासी।।३४।।
याकारणे केले बाळ।
आतां राहिले कर्तृत्व सकळ।
स्तनपान करोनि निर्मळ।
सुखे निद्रा करावी।।३५।।

तसेच श्रीविष्णूला ती म्हणते-

जो जो जो जोरे लक्ष्मीपती।
तुझी तवं अगाध कीर्ति।
अवतार धरूनि पंक्ती।
दुष्ट संहार पै केले।।३६।।
ते श्रम पावलासी थोर।
निद्रा करावी बा सत्वर।
म्हणोनि केला कुमर।
विश्रांती सुख पावावया।।३७।।

त्याचप्रमाणे ती शंकरास म्हणते –

जो जो जो जोरे बा शंकरा।
महादेव पार्वतीवरा।
करोनि दुष्ट सव्हारा।
बहु श्रम पावलासी।।३८।।
तरी आतां सुखे निद्रा करी।
कुमारत्व पावले यावरी।
आतां क्लेश नाही तरी।
पालखीभीतरी पहुडावें।।३९।।

याप्रमाणे अनुसूयेने तिन्ही देवांना पाळण्यात घालून, अंगाई गीत गाऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. एकनाथ कथानुसंधान पुढे चालवित म्हणतात –

ऐसे गेले बहुत दिवस।
मार्ग नाही जावयास।
न सुटे बाळपणाचा वेष।
सामर्थ्य विशेष अनुसूयेचे।।४१।।

(नारद पुन्हा तिघी देवभार्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देऊन अनुसूयेला शरण जाण्यास सांगतात. त्यावेळचे त्या तिघींचे गर्वोद्‌गारही मोठे अर्थपूर्ण आहेत.

तरी आमुचे आम्हीच पती।
सोडवूं आपले सामर्थ्यी।
अनुसूया ते बापुडी किती।
काय तिची कीर्ति आपुल्यापुढे।।४८।।

तिघींचाही अहंकार जागृत झाला आहे. स्वत:च्या सामर्थ्यावर त्यांचा अपार विश्वास आहे, आपल्यापुढे मर्त्य अनुसूया कशी फिकी पडणार याचेही चित्रण नाथांनी स्त्री-स्वभावातील बारकावे हेरून मोठे सुरेख केले आहे. दैवी सामर्थ्याच्या पार्श्वभूमीवर मानवीस्त्रीचे सतीमहात्म्य, पतिव्रत्य महात्म्य नाथांनी येथे अधिक उठावदार केले आहे.

पार्वती, लक्ष्मी आणि सावित्री आपल्या पतीप्रमाणेच त्वरेने अत्रींच्या आश्रमात पोहोचतात. अनुसूया त्यांचे स्वागत करते. षोडषोपचारे त्यांचे पूजन करून आपले भाग्य त्यांच्या आगमनामुळे उजळल्याचे सांगते. याउलट मनातून रागावलेल्या तिघीजणी अनुसूयेशी तुटकपणे वागतात आणि तिला बजावतात -

तिघी म्हणती आमुचे पती।
आणून देई शीघ्रगती।।५३।।

अनुसूयेनेही तेवढ्याच तत्परतेने देवपत्नींची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांचे पती आणून त्यांच्या पुढ्यात ठेवले व आपापलेपती ओळखून घेण्याची त्यांना विनंती केली! परंतु प्रयत्न करूनही या तिघींपैकी एकीलाही जेव्हा आपला पती ओळखता येईना तेव्हा त्यांची तारांबळ उडून चांगलीच गाळण उडली! अनुसूयेचे अगाध सामर्थ्य जाणून त्या तिला शरण जातात आणि आपापले पती परत देण्याची तिला विनवणी करतात. त्यांचा गळून पडलेला अहंकार, त्यांची आर्जवं बघून सती अनुसूया देवांना पूर्वरूपात त्यांच्यासमोर प्रकट करते. अशा रीतीने सतीची देवांवरही सत्ता चालते; असा सतीचा महिमा अगाध आहे.

देवही अनुसूयेच्या सतीत्वावर प्रसन्न होऊन तिला वर मागण्यास सांगतात; तेव्हा ती म्हणते, ''आज सहा महिने मला तुमचा लळा लागला आहे! म्हणून,

मग ते बोले करुणावचन।
अपूर्व तुमचे दरूशन।
मज न गमे तुम्हां विण।
अर्धक्षण जाणिजे।।६२।।

तेव्हा तुम्ही तिघेही एकरूपाने माझ्या घरी बाळ म्हणूनच नांदावे-'' अनुसूयेचा हा वर लगेच मान्य होतो -

मग देवत्रयाची मूर्ती।
करकमळी जाली शीघ्रगती।
दत्तात्रय नामे ऐसी ख्याती।
तिही लोकांप्रती विशेष।।६४।।

याप्रमाणे दत्तात्रेयाचा जन्म होऊन हे दत्तात्रेय जन्माख्यान संपते. आख्यानाची फलश्रुती सांगताना एकनाथ महाराज म्हणतात:

एका जनार्दन म्हणे।
दत्तात्रय जन्मकथन।
भावे करिता श्रवण।
मनोरथ पूर्ण श्रोतियांचे।।६७।।

देवादिकांच्या सामर्थ्यापेक्षा अधिक सामर्थ्य मनुष्यदेहांत, तपोबलाने अथवा सतीधर्म राखून पातिव्रत्याने स्त्रीला संपादिता येते; असा धार्मिक आणि नीतीचा उपदेश करण्यासाठी एकनाथांनी हे कथानक रचिलेले दिसते. त्यामुळे ते कीर्तनकारांनाही अतिशय प्रिय झालेले आहे.

*(संदर्भ : श्री एकनाथ महाराज यांची गाथा - संपादक- नानामहाराज साखरे, प्रकाशक: आवटे, इंदिरा छापखाना, पुणे १८३०, अभंग क्रमांक ३४१३)*

♦

## आरोग्यम् धनसंपदा

तोंड येण्याचा त्रास होऊ नये यासाठी पुढील गोष्टींची काळजी घ्या.

१. कायम पोषक आहार घ्या.
२. 'ब' जीवनसत्त्वाच्या गोळ्या ५ ते ७ दिवस घ्या.
३. आहारात दह्याचा समावेश करा.
४. तुरटीच्या पाण्याने चूळ भरा
५. कोमट पाणी पीत रहा.
६. मुखदुर्गंधीचा त्रास जाणवत असेल तर तो रोखा. तुळशीची पानं चावून खा. दंतवैद्याचा सल्ला घ्या.
७. कडक, तिखट, आंबट, खारट पदार्थांचं सेवन कटाक्षानं टाळा.

## सुविचार

आपल्या प्रामाणिकपणाचाही उपयोग होईल, पण केव्हा? तर दुसऱ्यास प्रामाणिक बनविण्याइतका आपला प्रामाणिकपणा बलवान असेल तेव्हाच!

**- स्वातंत्र्यवीर सावरकर**

मनी धरावे ते होते।
विघ्न अवघेचि नासोन जाते।
कृपा केलिया रघुनाथे। प्रचीत येते।।

**- समर्थ रामदास** (दासबोध)

# संथ वाहते कृष्णा माई...

• सौ. शालिनी अच्युत चक्रदेव (पृ.७३२), चिंचवड-पुणे भ्रमणध्वनी : ९६२३६५०६३३

*संथ वाहते कृष्णामाई*
*तीरावरच्या सुखदु:खांची जाणीव तिजला नाही।।*

हे गाणं खूपच गाजलं. कृष्णा नदीच्या काठावर सर्व सांगलीकर सुखाने नांदत होते. सगळीकडे सुख-समृद्धी होती. कृष्णा नदीला कुणी माता समजत असत तर कुणी तिला पूज्य देवता मानीत असत. कृष्णा नदीचं पाणी पूर्वी खूपच शुद्ध आणि निर्मळ होतं. पण आमच्या लहानपणापासून पिण्याचं पाणी बेचव आणि नदीच्या पाण्यात उसाची मळी सोडल्यामुळे पाणी खराब होई. पाणी पिताना निराळंच लागायचं पण आम्हाला त्या पाण्याची सवय झाली होती. परगावच्या पाहुण्यांना ते पाणी आवडायचं नाही. पूर्वी पाणी शुद्ध करण्यासाठी ॲक्वागार्डची सोय नव्हती. या वर्षी पंढरपूरची जशी वारी सुरू झाली, तशी पावसाळ्यातल्या पावसाची सुरुवात झाली व तो १५ दिवस पडतच राहिला. थोडी विश्रांती घेऊन पुन्हा पावसाने जोर धरला. त्यामुळे सगळी धरणं भरली. धरणांचे दरवाजे उघडल्यामुळे पाण्याचा विसर्ग होऊ लागला आणि कृष्णा नदीने आपला शांत स्वभाव सोडून रौद्र रूप धारण केले, होत्याचं नव्हतं झालं. मी शाळेत असताना पावसाळ्यात कृष्णा नदीला पूर येऊन सांगली गावात पाणी शिरत असे. आमच्या शाळेला सुट्टी असायची कारण शाळेच्या रस्त्यावर ५-६ फूट पाणी असायचं. शाळेला सुट्टी त्यामुळे आनंदच असायचा. आणि संध्याकाळी आयर्विन पुलावर पाणी बघायला जायचा कार्यक्रम असायचा. मी एकदा पावसाळ्यात सांगलीला गेले होते. नदीला खूप मोठा पूर आला होता. तेव्हा नदीच्या पात्रात नावांच्या शर्यती असायच्या. माझा धाकटा भाऊ रमेश १५-१६ वर्षांचा असेल आणि माझ्या दोन्ही मुली मोठी स्मिता व धाकटी सविता साधारण ५-६ वर्षांच्या असतील. पाणी बघायला दोघींना घेऊन गेला आणि दोघींना घेऊन शर्यतीच्या नावेत बसला. पुराच्या पाण्यात मधूनमधून भोवरे असतात. पण तिघेही सुखरूप घरी आले. गणपतीचीच कृपा म्हणायची. नदीला पूर आला की गणपती मंदिराला जाण्याच्या रस्त्यावर पुरुषभर पाणी असायचे. त्यामुळे माझे वडील (अण्णा) नावेत बसूनच गणपती पूजा करायला जायचे व नावेतूनच परत घरी यायचे. २००५ साली कृष्णा नदीला खूपच मोठा पूर आला होता. त्यावेळी माझा मधला भाऊ आठवडाभर गणपती मंदिरातच रहायला गेला होता. कारण तेव्हा तो पूजाअर्चा करत होता. ह्या वर्षी माझा धाकटा भाऊ बोटीतून गणपती मंदिरात रहायला गेला. गळ्यापर्यंत आलेल्या पाण्यातून तो गणपतीची पूजा करत होता. परंतु अजून पाणी वाढल्यामुळे त्याने लष्कराच्या ताब्यात मंदिर देऊन तो १०० फुटी रस्त्याला मधल्या भावाकडे गेला. तिकडच्या भागात पाणी आले नव्हते. जवळजवळ निम्मं सांगली गाव पुराच्या पाण्यात होते. संबंध गणपती पेठ, गवळी गल्ली, सराफ रोड, हरबट रोड, मारुती रोड, कोल्हापूर रोड, हरिपूर रोड, सांगली स्टँड रस्ता, सगळ्या बसेस, एसट्या पाण्यात होत्या. सगळीकडची दुकाने पाण्यात होती. केवढं हे नुकसान झालं होतं. सगळ्या बैठ्या घरातून पाणी शिरलं होतं. सगळ्यांनी पै-पै जमवून कष्ट करून स्वत:चा संसार उभा केला होता. पण डोळ्यादेखत सर्वच गेलं होतं. काय मन:स्थिती झाली असेल त्या सर्वांची? हरिपूर रस्त्याला खूप वस्ती वाढली आहे. सगळ्या बैठ्या घरांची वाताहत झाली. हरिपूरचं संगमेश्वर देऊळ सबंध पाण्यात होतं. तसंच नरसोबावाडी, औदुंबर तसेच तिकडचा सगळा परिसर पाण्यात होता. माझ्या माहेरच्या घरीही पहिल्या मजल्यावर पाणी आले होते. दोन्ही भाचे आणि दोन्ही सुना तिसऱ्या मजल्यावर जीव मुठीत घेऊन ८-१० दिवस राहिले. कारण ८-१० दिवस वीज नाही, पाणी नाही, दूध नाही, फोन लागत नव्हते. बाकी जवळचे नातेवाईक होडीतून १०० फुटी रोडला भावाकडे रहायला गेले. पूरग्रस्तांना निरनिराळ्या संस्था खूप मदत करत होत्या. मेणबत्त्या, दूध, नाश्ता, जेवणाची पाकिटे, कपडे-चादरी वगैरे निरनिराळ्या ठिकाणी पूरग्रस्तांना सुस्थळी हलवण्यात येत होते. पण ज्या व्यापाऱ्यांचं, घरांचं नुकसान झालंय ते कधी भरून काढणार, पूरग्रस्ताच्या प्रत्येकी घरटी रु.५०००, १० किलो तांदूळ, १० किलो गहू व बँकेच्या खात्यावर रु.१०००० जमा होणार होते. माझ्या भाच्याच्या दुकानाचं ८ ते १० लाखांपर्यंत नुकसान झालं. कित्येकांच्या घरात साप, नागही शिरले होते. अशी झाली सांगली शहराची दैना.

डिसेंबर महिन्यात सांगलीला जाण्याचा योग आहे. तेव्हा सबंध हिंडून पाहणी करणार आहे.

♦

पुस्तक-परिचय

# कवी श्री. र.श्री. चौधरी : काव्यसंग्रह : अपूर्व भेट

• श्यामला पुरंदरे (जाईल), (पृ.७५५) पुणे भ्रमणध्वनी : ९४०५८४५९८४

२०१९ वर्ष उजाडलंच मुळी आनंदाचे भरभरून क्षण घेऊनच! आपल्या पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघास ASCOP तर्फे आयोजित केलेल्या समूहगान स्पर्धेत बक्षीस मिळाले. मातोश्री वृद्धाश्रमात चैतन्य भजनी मंडळाने अप्रतिम कार्यक्रम सादर केला. याचवेळी एका ज्येष्ठतम व्यक्तिने माझ्या हाती स्वरचित 'अपूर्व भेट' हा काव्यसंग्रह प्रेमाने दिला. Pleasant Surprise म्हणतात ते हेच नं?

घरी निवांतपणे हे टुमदार पुस्तक बघताना पहिली गोष्ट जाणविली ती म्हणजे डोळ्यासमोर साक्षात वृंदावन उभे करणारे आकर्षक मुखपृष्ठ होय. अशुद्ध शब्दांची शुद्ध रूपातील सूची पण भावली. तब्बल ४५ कवितांचा हा आगळावेगळा गुच्छ पुढील पिढीला समर्पित केला आहे. अहमदपूरचे श्री. चौधरी मामा 'पसायदान' या घरकुलात राहतात व समाजासाठी शांतता, शुद्धता व सद्‌गुणांचे दान ईश्वरापाशी मागतात. ३२ वर्षांच्या नोकरी काळात कवीने जे अनुभवले, जे उघड्या डोळ्यांनी पाहिले व त्यामुळे त्यांच्या मनात ज्या विविध विचारांच्या लाटा उसळल्या त्याचीच निर्मिती म्हणजेच 'अपूर्व भेट'!!

प्रा. डॉ. दिनकर कुलकर्णी यांनी प्रस्तावनेमध्ये लिहिल्याप्रमाणे कवीचे वाचन अफाट आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, राजकीय अशा निरनिराळ्या प्रांतांमध्ये त्यांच्या प्रखर लेखणीने आत्मविश्वासाने प्रवास केला आहे. सामाजिक सुधारणांसाठी अंधश्रद्धा, स्त्रीनिंदा, भ्रष्टाचार, गुंडगिरी, भंपक पुरुषार्थ, बलात्कार याविरुद्ध तीव्र ताशेरे ओढले आहेत. प्रामाणिकपणा, स्वतःच्या मर्यादांची जाणीव व अन्यायाविरुद्ध हृदयापासून निघालेली पोटतिडिक या सर्वांचा अनुभव वाचकास वेळोवेळी मिळतो. अगदी पौराणिक काळापासून ते आधुनिक विश्वापर्यंतचा त्यांचा अभ्यास चकित करणारा आहे. उर्मिलेचे दुःख कवीला व्यथित करते तर स्वसंरक्षण करणारी आजची स्त्री त्यांना वंदनीय वाटते. भक्तिभावाचा भुकेला ईश्वर त्यांना आदर्शवत वाटतो तर मंदिरात चाललेले गैरव्यवहार पाहून कवी परमेश्वराजवळ गाऱ्हाणे मांडतो.

स्त्रीसुलभ भावना हा कवीचा अत्यंत आवडता विषय आहे, कृष्णराधेचे मिलन कळल्यावर रुसलेली रुक्मिणी घरदार सोडून कृष्णाच्या रूपातील श्रीविठ्ठलाच्या शेजारी उभी राहते. पण याठिकाणी देखील तिला भक्ताशी एकरूप झालेला विठूरायाच सापडतो. आणि ती निमूटपणे पंढरीनाथाची सेवा करते. गजऱ्यातील फुलाला पण परमेश्वराच्याच चरणी राहायला आवडते. गवळण बनून आलेली देवकी कान्हाला उचलून घेते. माधव भाववश होऊन जन्मदातीस घट्ट कवटाळतो. हीच आहे कवीच्या मनातील पान ४५ वरील रसिकांस दिलेली अपूर्व ममता भेट होय. मानवी मनाचे कंगोरे ठिकठिकाणी आढळतात. श्रीहरीला सावली देणाऱ्या कळसाचे मंदिराच्या पायाशी गर्वहरण होते. विस्तारित 'मा फलेषु कदाचन'द्वारे विहित कर्म मनःपूर्वक केल्यावर Returned gift ची अपेक्षा करू नये हा भगवद्‌गीतेतील सुंदर संदेश मिळतो.

देशातील बळीराजाची दैनावस्था, अन्यायाच्या मुसळधार पावसाने वाहून जाणारे नीतिमत्तेचे रोपटे यांचे वर्णन वाचून वाचक ठोस कार्य करण्यासाठी आशावादी पावले उचलण्याचा विडा उचलतो हेच या ६४ पानांचे घवघवीत यश म्हणायचे. संतांचे जन्मस्थान, कलांचे माहेरघर, वैज्ञानिकांचे उगमस्थान व रंगीबेरंगी निसर्गाने नटलेल्या भारत देशाबद्दल प्रचंड अभिमान वाटतो पण त्याचवेळी चालू घडामोडींबद्दल कविच्या मनात चीड उत्पन्न होते.

संसार सोडून गेलेल्या पत्नीला ते गहिवरून साद घालतात व तिला भेटण्यासाठी प्रत्यक्ष मृत्यूला जवळ करण्याची इच्छा प्रदर्शित होते. जोपर्यंत आपण परावलंबी नाही, तोपर्यंतच जगण्यात स्वारस्य आहे हे त्रिकालाबाधित सत्य कवी सहजपणे सांगतो. चिंतनात्मक व तत्त्वज्ञानाच्या पातळीवर शब्द वावरत असताना पिकले पान मोक्षाच्या अंगणात अलगद पडावे, जगण्यासाठी जिव्हाळ्याच्या ओलाव्याची नितांत गरज असते, अश्रूंचा महापूर, पापणीचा बांध, कृतज्ञतेचा गंध, केविलवाणी साद, दुःखाचा गहिवर, पृथ्वीसम गोल जेवणाच्या ताटात चंद्रकोरीइतकी भाकरी ही शब्दरचना काळजात कट्यारीसारखी असह्य वेदना करते. मातृदिनादिवशी आईच्या आठवाने कवीच्या नयनातून गंगाजमुना वाहतात. याचवेळी मम्मार्डडीच्या संस्कारात मातृभाषेचा विसर न पडो ही कामना श्री. चौधरी व्यक्त करतात.

शब्दशब्द दुमदुमला तर क्रांतीचा नाद निर्माण होतो. शब्दशब्द जुळताच सुसंवाद तयार होतो. प्रभावी शब्दशब्दांनी समाजामध्ये जागृती होऊन देश सुधारायला चालना मिळाली की चौधरी मामा खूप खूश होतील.

बुजुर्ग कहते है कि हर मुश्किल के पिछे सफलता होती है। बस, इतनी ही उमेद रखते है, आप आगे बढिए कविजी, हम सब आपके साथ हैं।

निरनिराळ्या मंत्रांचा ५ लाखांच्यावर जप लिहिणाऱ्या श्री. चौधरी यांच्या या असामान्य छंदाचे खूप खूप कौतुक! ३० मार्च २००६ गुढीपाडव्यादिवशी पहिली आवृत्ती निघाली. यापुढेही कधी हळवी तर कधी वज्रादपि कठीण होणारी लेखणी असाच यशस्वी प्रवास करू दे, हीच दयाघना विनम्र प्रार्थना!!

धन्यवाद

♦

# कविता

♦ कविः मोरेश्वर मराठे (पृ. ४६८), सांगली | भ्रमणध्वनी : ९४२२४२०६६९

## मराठे

मराठे तितके मेळवावे
एका छत्राखाली आणावे
जुन्या जाणत्या अन् हितवादी
प्रतिष्ठीत मराठे प्रतिष्ठानच्या ।।१।।

एकीचे बळ सर्वांनी आठवावे
एक एक मराठे यांच्या
बुद्धी, शक्ती अन् युक्तीचे
कौतुक जरा आळवावे ।।२।।

होता सारे एक मराठे
तन मन आणि किंचित् धनाने
थोडा धीर धराल जर मनाने
जुळतील मनें कणाकणाने ।।३।।

कणखर बाणा अन् ताठ कणा
नाही तडजोड तत्वाशी
मोडेल पण वाकणार नाही
देतील परीक्षा सत्याची, सत्त्वाची ।।४।।

कुलसम्मेलनाची व्याप्ती आणि वाढत गेली रया
गोवा, कर्नाटक, गुजरात आणि आता गया
छोटी पाऊले पडता पडता झाले पाऊल मोठे
एक पानी हितगुजचे झाले स्वरूप मोठे ।।५।।
अटकेपार झेंडा रोवला त्या पेशवे मराठ्यानी
साहित्यिक, उद्योगी, दानी असे नाव कमावले या मराठ्यानी
-इति-



## क्षणभर विश्रांती

नाही देहाचा भरवसा
जसा किरणाचा कवडसा
जसा क्षणभरीचा विसावा
जन्ममृत्यूच्या फेऱ्यात ।।१।।

जववरी आहे जीवनज्योत
तववरी आहे सारे मस्त
नातीगोती माझे माझे
इच्छा अपेक्षा वासना स्वार्थ ।।२।।

क्षणोक्षणी होते कमी वासना
अपेक्षा ही नुरती काही
देव देतो किती तरीही
रिते मोकळे दोन्ही हात ।।३।।

लवलवते समयीची वात
जववरी तेल अन् कापूस वात
तववरी मिळतसे प्रकाश शांत
जववरी आहे जीवनज्योत ।।४।।

# ।। न भूतो न भविष्यति ।।

• श्री. अच्युत महादेव चक्रदेव, (पृ.७३२), चिंचवड    भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३

**व**याचे ८-९ वर्षापासून मी सांगलीविषयक माहितीमध्ये विशेष रस घेत आहे. माझ्या दोन आत्या सांगलीच्याच.

१. श्रीमती बनूताई दांडेकर – यांचे पती श्री. कै. काशिनाथपंत दांडेकर यांनी शेतकऱ्यांना सातत्याने लागणारे लोखंडी नांगराचे फाळ विशेष मेहनत घेऊन बनवले होते. पुढे त्यांनी एक दोघांचे मदतीने सांगलीतच बुरुड गल्लीत स्वतःचा वर्कशॉप सुरू केला. या नांगराचे फाळांना प्रचंड मागणी येऊ लागली. सुरुवातीचे दोन-चार मजुरांवरून संख्या २०० पर्यंत गेली. कालौघामध्ये ती काशिनाथपंत दांडेकरांचे शोचनीय निधन झाले. तीन मुले होती. मोठा मुलगा ती. बाबूराव दांडेकर मॅट्रिक उत्तीर्ण झाला. आता त्याने पुढे काय करावयाचे हे ठरविण्याबद्दल आई ती. बनूताई काहीच सांगू शकत नव्हती. मुळात भोळसर इ. इ. तिने सल्ला दिला की, मोठे मामा ती. महादेव चक्रदेव यांचेकडे व माझे चुलते ती. गोविंद मामा चक्रदेव यांचेकडे जाऊन सल्ला घे. त्याप्रमाणे ती. बाबूराव दांडेकर पुणे येथे आमचे घरी आले. वडिलांनी स्पष्ट सांगितले की, ''वडिलांचे पायावर तुला मोठे काम करावयाचे आहे. तू मेकॅनिकल इंजिनीयर हो.'' मुळात हुशार व चांगले व्यक्तिमत्त्व असलेल्या बाबूरावांनी इंजिनीयरिंगचे शिक्षण आमचेकडे राहूनच पूर्ण केले.

सांगलीला येऊन खूप मेहनत घेऊन वर्कशॉप वाढविला. त्यात आणखी भरच घातली. प्रिंटिंग स्टेशनरीला लागणाऱ्या शार्पनिंग मशिनमध्ये नव्याने सुधारणा केली. व त्याचेही उत्पादन सुरू केले. बाबूरावांचे धाकटे बंधू ती. आबा दांडेकरही मॅट्रिक उत्तीर्ण झाले. पण ते म्हणायचे, ''सगळेच लोहारकामात कशाला? मी शास्त्र विषयांत संशोधन करणार आहे.'' पण माझे वडिलांनी त्याला विरोध केला व त्यानेही मेकॅनिकल इंजिनीयरिंग पूर्ण केले. व त्यात हुशारीने फौंड्रीची भर घातली व दांडेकर ब्रदर्स शेगडी, तवे, चिमटे, लोखंडी कढयाचे उत्पादन प्रचंड प्रमाणात सुरू केले. मधला भाऊ मोरेश्वर दांडेकर हेही हुशार होते. नेहमीचेच व्यवसायात ते उत्कृष्ट सेल्समन असल्यामुळे त्यांनीच 'दांडेकर ब्रदर्स' हे दुकानांत दांडेकर ब्रदर्सची उत्पादने विक्री सुरू केली. प्रचंड खप वाढला. दांडेकर ब्रदर्स हे नाव सांगलीत सर्वतोमुखी झाले. सगळेच अगदी छान, छान चालले होते.

पण... गांधी वधोत्तर ब्राह्मण ब्राह्मणेतर वादामध्ये गुंडांनी संपूर्ण कारखाना, दुकान जाळून भस्मसात केले. आता काय?

पण दांडेकर बंधू हे कोकणस्थी असल्याने ते मुळीच डगमगले नाहीत. राखेतून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे कात टाकून पुन्हा पूर्वीपेक्षा अधिक उत्साहाने त्यांनी काम सुरू केले. या सर्व घडामोडीत आता सांगलीचे मामा बनलेले महादेव मामा चक्रदेव व गोविंद मामा चक्रदेव यांनी अर्थातच मोलाचे आशीर्वाद स्वरूप सहाय्य केले. दांडेकरांचे स्वीय सहाय्यक 'अप्पा मराठे म्हणून होते ते आता हयात नाहीत.

२. दुसरी आत्या ती. कै. अंबू आत्या केळकर.

यांचाही गावभागात तात्यासाहेब केळकर वाडा म्हणून मोठा वाडा होता. त्यालाही गांधी वधोत्तर दंगलीची, जाळपोळीची झळ लागलीच. ती. कै. आंबूआत्या या व त्यांचा एकुलता एक मुलगा सांगलीत गणेशा केळकर म्हणून ख्यातनाम होता. या गणेशाने रा.स्व. संघाचे मदतीने यशस्वी तोंड दिले. तावून, सुलाखून पुनरपि सर्व प्रस्थापित केले.

ती. 'गणेश केळकर' हा रा. स्व. संघाचा निष्ठावंत, लाथ मारेन तेथे पाणी काढीन या धैर्याचा अस्सल स्वयंसेवक. हिंदुत्वापुढे कुणालाही न जुमानणारा, प.पू. डॉ. हेडगेवार, प.पू. गोळवलकर गुरुजी, स्वा. वीर सावरकर यांनाच आपली प्रमुख दैवते मानणारा, पुन्हा सर्वतोपरी उजळवून टाकणारा, यात नवल ते काहीच नाही. डॉ. प.पू. हेडगेवार यांनी उगाच नाही, हम हिंदू है 'गर्व से कहो हम हिंदू है!' हे शब्द सार्थ केले.

'गणेशा केळकर' हा स्वतः उत्तम सिव्हिल इंजिनीयर होता. पण काही स्थापत्यविषयक सुधारणा सांगलीत करावयाच्या असल्याने मुंबई महापालिकेत सिव्हिल इंजिनीयरची चांगल्या पगाराची नोकरी न पत्करता मिळेल तिथे म्हणजे इंजिनीयर असला तरी बँकेत ऑफिस अधीक्षक म्हणून काम पत्करून त्याने सांगलीतच वास्तव्य केले आहे.

हिंदुत्वाकरिता काँग्रेस नेते काकासाहेब गाडगीळ, वा.वि. साठे गुरुजी, आपटे गुरुजी, सेवक सेवानंद बाळूकाका कानिटकर यांच्याशीही गणेशा केळकरने तावातावाने वाद घातले आहेत. हे सांगलीत चांगलेच सुप्रसिद्ध आहे. अगदी पुण्यात सुद्धा.

३. माझे वडिलांचे आजोळ ती. कै. बाळंभटजी टिळक. हे स्वतः वेदशास्त्र संपन्न प्रख्यात ज्योतिषी, न्यायवैद्यक निपुण

असे वेदविद्यासंपन्न प्रकांड पंडित होते.

त्यांचे मोठे चिरंजीव ती. दत्तंभटजी टिळक यांनीही आपल्या अतिशय धार्मिक वृत्तीने सांगलीत 'टिळक गुरुजी' हे नामाभिधान प्राप्त केले आहे.

त्यांचे धाकटे बंधू ती. नरहर भट टिळक ''दत्त संप्रदायाचे निष्ठावंत अनुयायी, कायम एखाद्या ऋषिमुनीप्रमाणे जटा, दाढी वाढविणारे होते. ते विशेष कोणाशी बोलत नसत. ते तपश्चर्येकरिता हिमालयात गेले असे म्हणतात. बरीच वर्षे झाली म्हणून थोरले बंधू ती. दत्तंभटजी टिळक यांनी त्यांचे श्राद्ध करायचे ठरविले. पण कसे कुणास ठाऊक? आंतरिक, आध्यात्मिक शक्तीमुळे असेल. नक्कीच दत्तंभटजीचे स्वप्नांत नरहर भट, स्वामी नरहर टिळक गेले आणि म्हणाले, ''दादा, मी जिवंत आहे माझे श्राद्ध करू नकोस. नरहरी भटजी, स्वामी टिळक व माझे वडिलांचे आजोबा ती. कै. बाळंभटजी टिळक वेदमार्तंड यांचेविषयी अनेकानेक कथा सांगलीत पण सत्यकथाच नक्कीच ऐकायला मिळतील यात शंका नाही.

आता पार्श्वभूमी माझ्या सांगलीविषयक आठवणींची पुरे झाली. विषयांतर खूप झाले पण रहावलं नाही काय करणार?

आता मुख्य विषय - सांगली, कोल्हापूर पूरविषयक. या वर्षीचा महाभयानक पूर... माझी सासुरवाडी सांगलीचे वेदमूर्ती कै. अण्णा पाटणकर, सांगलीच्या सांगली सरकारचे महागणपतीची जवळजवळ ४० वर्षे पुजारी असलेले, माझे वडील ती. कै. महादेव चक्रदेव हे पेशव्यांचे सारसबाग, तथा तळ्यातील गणपतीचे ४०-४२ वर्षांचे पुजारी. हा अत्यंत विलक्षण योगायोग आहे. सासरे व वडील दोघेही निष्ठावंत गणपती भक्त. हाच आशीर्वाद आमचे दोन्ही चक्रदेव, पाटणकर कुटुंबीयांवर निश्चितपणे आहे अशी आमची सर्वांचीच निष्ठा आहे.

पुरे, पुरे, पुरे हे स्वपुराण

आता मुख्य विषय पण यातही स्वतःला कसे टाळणार?

सांगली महागणपतीचे मुख्य सभामंडपात गुडघाभर पाणी. माझे धाकटे मेव्हणे द्वय चि. अशोक व रमेश पाटणकर यांचेकडे सध्या पूजा आहे. पूजा तर व्हायलाच पाहिजे. पण गुडघाभर पाण्यांतून कसे जाणार - त्यांनी एक होडी केली व ते पूजेला जाऊ लागले. घरात पाणी, दारात पाणी, मंदिरात पाणी, पाणीच पाणी चहूंकडे पण निष्ठेने ते पूजा करीत राहिले. सांगली सरकारांचे ते लक्षात आले. ते पाटणकर बंधूंना म्हणाले, ''तुम्ही आता देवळातच रहा. घरी जाऊ नका. इथे देवळातच राहण्याची, जेवण, नाश्त्याची सोय केली आहे. ते ४-५ दिवसांत घरी आले नाहीत.

नदीचे अगदी जवळच घर बांधलेले माझे मेव्हणे अभ्यंकर यांचे पुरामुळे काय काय हाल झाले विचारूच नका. पै-पै साठवून उभारलेले घर, डोळ्यादेखत गाद्या पांघरुणे सारं सारं काही पुराने गिळून टाकले.

आता काय करणार? मेव्हण्यांचे फक्त उदाहरण दिले. पण आसपासचे शेतकऱ्यांचे पोटापुरते कसे बसे मिळवणाऱ्यांचे, हातावर पोट असणाऱ्यांचे काय? नुकसानभरपाई, किती, कुणी अन् कुणाकडे मागणार? हे सर्व गुलदस्त्यांतच आहे.

टिळक गुरुजींचे घर कृष्णामाई नदीचे अगदी मध्यावर आहे.

डोळ्यादेखत प्राणापलीकडे जपलेल्या पूर्वजांनी लिहिलेल्या पोथ्या, पूजाविषयक सामान इ. इ. पुनश्च हरी ओम म्हटले तरी कसे म्हणणार?

आता सांगलीचे सुप्रसिद्ध आयर्विन पुलावर जाऊ

काय, काय, वहात येतंय, ते बघा झोपडीत पाणी शिरले कसे तरी जमवलेले संसाराचे सामान, ॲल्युमिनियमची भांडी, कसेबसे उभारलेले तट्ट्यांचे दरवाजे, जाळी, तळावर असलेली कुत्री, सगळंच वाहून चालले आहे.

आणखी काय, काय दिसताय मुकी जनावरे, गायी, म्हशी कुत्री, मांजरं असह्य दीनवाण्या नजरेनं वाहून जात आहेत. माणसांनी केलेल्या अनेक संघटना माणसांना वाचवू पाहात आहेत. एवढं कशाला, हरिपूरची मेव्हणी अभ्यंकर तिला कसेतरी काहीनी ओढत, ओढत होडीत घेतले. ती वाचली. पण स्वकष्टाने उभारलेले, घरकुलाची ह्यातली भांडीकुंडी, गाद्या, उशा, सगळं सगळं काही वाहून चाललाय.

ते पहा, हौसेनं श्री. भाऊ माने यांनी उभे केलेले फर्निचरचे दुकानात पाणी शिरल्यामुळे त्यांनी बनवलेले सोफा, सेट्स अन्य टेबल खुर्च्या, स्टूल्स, सुतारकामाची हत्यारे वाहून चालले आहे. टीपॉय, भिंतीवरील आकर्षक नैसर्गिक देखाव्यांच्या लाकडी चौकटी इ.इ.

मुद्दाम नदीचे जवळ गुरांना हिरवेगार, कोवळे लुसलुशीत गवत खायला मिळेल या आशेने उभे केलेले गोठे त्यांचेबद्दल दयाळू कृष्णामाईला दया येऊन तिने मुक्या जनावरांचे घास घेतले. गायी, म्हशी, बैल, वासरे, रेडकू सगळ्यांना मायेने आपलेसे केले. तिचेकडे म्हणण्यापेक्षा परमदयाळू पर्जन्य राजाकडे माणूस, जनावरे, वाहने, सजीव, निर्जीव काहीही मतभेद नाहीत. म्हणूनच पाण्याचे लोंढ्याबरोबर चारचाकी ट्रक, मोटरकार्स, दोन चाकी मोटर, सायकली, स्कूटर्स, तीन चाकी अनेक रिक्षा सारं, सारं काही पाण्याने गिळंकृत केले आहे. मला जनावरांची भाषा समजत नाही. पण भावना समजू शकते. त्या दोन गायी एकमेकींकडे पहात म्हणत असतील, अग कपिले, 'माणसं, आपल्याला गोमाता म्हणतात, आपलेकडे नव्हे आपले पोटांत ३३ कोटी देवांचे वास्तव्य आहे म्हणतात, मग

एवढ्या ३३ कोटीतील कमीतकमी एखाद्या देवाने तरी आमची या जलप्रलयापासून सुटका करायला पाहिजे ना? पर्जन्य राजा संतापला तर नाही ना? तो म्हणत असेल, मी एवढा वर्षानुवर्षे नियमित सेवा करत असूनसुद्धा माणूस कृत्रिमरीतीने आम्हांला का बोलावतो आहे.

गाव भागातील प्रसिद्ध मारुती चौकात माझे भाच्याचे 'विविधा' नामक दुकान आता होते असंच म्हटलं पाहिजे. दुकान अगदी रस्त्याच्या कडेला असल्याने तेथेही भरपूर पुस्तके, वह्या, लेखनसामग्री, निरनिराळ्या प्रकारचे पुस्तकांना वेष्टणे घालण्यासाठी उपयोगी असलेल्या विविध कागदांच्या गुंडाळ्या सगळे काही पर्जन्यराजाने गिळंकृत केले. पर्जन्यराजाला एवढा लेखन वाचनाचा नाद आहे हे माहीत नव्हते. अन्यथा दरवर्षी श्राद्धाला त्या, त्या व्यक्तीच्या आवडीचे जिन्नस केले जातात. तसेच पर्जन्यराजाला काही पुस्तके, लेखन सामग्री यांचा नैवेद्य दाखवला असता. पुन्हा पर्जन्यराजा संतापला, भडकला, अरे माणसा, माणसा तू एवढा निर्बुद्ध कसा? मी अजरामर आहे हे तुला माहीत नाही असे दिसते? माझे श्राद्ध करतोय? अश्वत्थामा इतर सात अतृप्त आत्मे यामध्ये माझीही गणना करायला हवी होतीस. निर्बुद्ध माणसा कुठे फेडशील हे पाप? का राहिलेले सगळे काही गिळंकृत करायला पुन्हा पुढचे वर्षी येऊ पर्जन्य राजा असे म्हणाला खरे. पण आपल्या पायाखाली काय जळते आहे. याची माणसाला कल्पना नसते हेच खरे. पुढीलवर्षी कशाला? मी हे लिखाण करत आहे आणि तिकडे बातम्यांचा पाऊस चालू आहे. पर्जन्यराजाने पुण्यवान, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत नव्हे पेशव्यांचे काळातील भारताचे प्रत्यक्ष राजधानीत नुसता उच्छाद मांडला आहे.

अजून सांगली, कोल्हापूर अर्धवटच झाले आहे. थोडी विश्रांती घेतो. साहित्यिक लिखाणच फार झाले. आता वास्तव!

मी माझ्या भाच्याचे वानगीदाखल फक्त उदाहरण दिले. मारुती चौकातच भर वस्तीत डावीकडे, उजवीकडे निरनिराळी असंख्य दुकाने आहेत. टेलर्स, पादत्राणाची, किराणा भुसार मालाची, स्टेशनरी, औषधे, केशकर्तनालये, सोनार, सराफ, चितळे बंधू प्रमाणे काही स्वीट मार्टस्, मुख्य म्हणजे रुग्णालये, त्याला लागून व इतरत्र असलेली औषधांची दुकाने, आणि हे झाले फक्त मारुती रोडवरचे, अशीच सर्व ठिकाणी म्हणजे गणपती पेठ, खण भाग, स्टेशन रोड, एसटी स्टँड, मुलामुलींची शाळा, कॉलेजेस, त्यांची वसतिगृहे, मुख्य म्हणजे नाशवंत मालाची फळे, पालेभाज्या विक्रीची दुकाने, प्रत्यक्ष मंडई, तळमजल्याला असलेले जुने वाडे, सगळं सगळं काही पाण्यांतच पाण्यांतच. काय आणि किती वर्णन करायचे?

मला एक आठवतेय. माझे मावसकाका प्रथम साताऱ्यात होते आणि आता गेली पाच वर्षे सांगलीत आले आहेत. ती. मोरूकाका भातखंडे, त्यांची पत्नी म्हणजै सौ. शारदाकाकू सहज पूर बघायला म्हणून नदीजवळ गेल्या. त्या परत घरी आल्याच नाहीत. काका काळजीतच पडले. दुसरे दिवशी एका शेतकऱ्याने घरी मोठ्या मुश्किलीने आणून सोडले. त्या उभ्या होत्या तेथे प्रचंड मोठा लोंढा आला आणि त्या शेतकऱ्याने त्यांना ओढले आणि स्वतःचे घरी आणून सोडले. हे भातखंड्यांचे निमित्त झाले. अशा कितीक महिला, मुले, त्यांची जिवापाड जपलेली घरे, सामान इ.इ.

काय, काय आणि कोणाचे म्हणून वर्णन करायचे.

सरकार तरी किती आणि कोणा, कोणाची नुकसानभरपाई देणार?

आता माझं कार्यक्षेत्र!

सांगली जिल्हा कारागृह. अगदी मध्यावर असलेले. आणि शेजारीच असलेले सांगलीचे प्रसिद्ध 'प्रतापसिंह उद्यान'. सुमारे २५० कैदी... बराकीत १००-२०० कैदी सुद्धा. गुडघा पाणी. तिथे त्यावेळी असलेले श्री. कांबळे जेलर जवळच आटपाटीला राहणारे. त्यांचा मला फोन आला. सर, मी आता काय करू? स्वयंपाकघर पाण्यात, किरकोळ उद्योग व्यवसाय, कैद्यांकरिता काढलेले तेही पाण्यांत.

मी त्यांना म्हटले, कांबळे तुम्ही कुठलाही धोका पत्करू नका.

सांगली जिल्ह्याचे कलेक्टर, पोलीसप्रमुख, सिव्हिल सर्जन आणि पालकमंत्री यांचा सल्ला घ्या. हे कैदी सध्या सरकारच्या ताब्यात असलेले. त्यांचाच सल्ला घ्या आणि निर्णय घ्या. त्यांचीही तुमच्याप्रमाणेच जबाबदारी आहे. आता महाराजा प्रतापसिंह उद्यान तेही अर्धे पाण्यात आहे. तेथे पिंजऱ्यांत असलेल्या सिंह, वाघ, माकडे, पोपट इ.चे काय?

अशी आहे, सांगली, कोल्हापूरची महापुराची हकिकत. अजूनही मला ती अर्धवट वाटतेय.

अरे हो, आपले हितगुजचे व सांगली अधिवेशनात उत्साहाने भाग घेणारे श्री. वि.म. मराठे त्यांचं काय? मी त्यांना फोन करायला खूप खूप प्रयत्न केला. पण... या रस्त्यावरचे सर्व फोन बंद आहेत असे सारखे हिंदी, इंग्रजी, मराठीत फोन येत होते. ही फक्त गावभाग मारुतीची हकिकत. गणपती पेठ, खणभाग, रिसाला रोड इ.इ.चे काय?

आपल्या पायाखाली काय जळतंय याची कल्पना नसते. तद्वत मी इकडे सांगली, कोल्हापूर प्रचंड महापुराची माहिती लिहीत आहे. सहज दूरदर्शनवर पाहिले तर पर्जन्यराजाने आपल्या

कृपा की अवकृपेची पावले आता पुण्याकडे वळवलेली दिसते.


मी मूळचा पुण्याचा. परंतु आता प्रसंगावशात चिंचवडला राहायला आलो आहे. आता सांगली थांबवतो व पुण्याकडे वळतो आहे.

अरे हो, आताच माझी पत्नी सौ. शालिनी चक्रदेवने तिचं माहेरच सांगली असल्याने तिनेही 'हितगुज'कडे ते वर्णन पाठवले आहे. ठीक आहे.

♦

---

# पाककृती



## उपवासाचे पॅटीस किंवा कचोरी

साहित्य : उकडलेले बटाटे ४-५, साबुदाणा पीठ १/२ वाटी, मीठ चवीनुसार, मिरचीचा खरडा, लिंबू, साखर, आवडीचे ड्रायफ्रूटस बारीक तुकडे, खोवलेला नारळ २ वाटी., कोथिंबीर.

कृती : प्रथम सारणासाठी खोबऱ्यामध्ये आपण चवीनुसार मीठ, मिरची, लिंबू, साखर घालावे. नंतर त्यामध्ये ड्रायफ्रूटसचे तुकडे घालावेत. कोथिंबीरही घालावी. नंतर उकडलेले बटाटे किसून घेऊन त्यामध्ये साबुदाणा पीठ व चवीनुसार मीठ घालावे. एकसारखे मळून त्याची वाटी किंवा पारी करावी व त्यामध्ये खोबऱ्याचे सारण भरून लाडूसारखे गोल बनवावे. नंतर साबुदाणा पीठात घोळवून तेलात खरपूस तळावेत. दह्याच्या चटणीसोबत खावेत.

**– सौ. पल्लवी मनीष मराठे**, सांगली

## सुगरणीचा सल्ला

१. बटाट्याचे काप अधिक कुरकुरीत होण्यासाठी तळण्याअगोदर अर्धातास ते पाण्यात बुडवून ठेवावेत.

२. लोणी काढताना त्यात मीठाचे चार खडे टाकल्यास तुपाला कणी चांगली येते.

३. फ्रीजमध्ये ठेवताना कणीक बंद डब्यात ठेवावी.

४. टोमॅटो सूप घट्ट व पौष्टिक होण्यासाठी त्यात थोडा भिजलेला साबुदाणा घालावा.



## खरवस बर्फी

साहित्य : म्हशीचा घट्ट चीक १ वाटी, साखर, वेलची पूड, काजू बदाम काप.

कृती : चीक नुसताच कुकरमध्ये शिजवून घ्यावा. गार झाल्यानंतर तो घट्ट होतो. नंतर शिजलेला चीक किसून घ्यावा. जेवढा खिसलेला चीक असेल तेवढीच साखर मिसळून दोन्ही एकत्र परतवावे. कढईमध्ये गोळा होईल इतपत परतवावे. नंतर एका ताटामध्ये थापून त्यावर काजू, बदाम काप घालावेत. थंड झाले की वड्या कापाव्यात.

**सौ. पल्लवी मनीष मराठे,**
सांगली (९८८१३०२४८४)

# सहवेदना

**कै. श्री.वि.म. मराठे (पृ. २३५), सांगली**

कार्यकुशल अभियंते आणि प्रतिभासंपन्न लेखक श्री. सांगलीचे श्री. वि.म. मराठे आज आपल्यात नाहीत याचे अतीव दुःख झाले आहे. सांगलीत मराठे प्रतिष्ठानचे संमेलन यशस्वी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचे 'हितगुज'मध्ये नियमित लेखन प्रसिद्ध होत असे. 'हितगुज'वर त्यांचा फार लोभ होता. माझे नेहमी कौतुक करीत असत. संपादकीय आवडते, कथा छान जमली आहे, असे दूरध्वनी करून नेहमी सांगत असत. इतकेच नाही तर जराही आळस न करता पत्रव्यवहार नेहमी करत असत. आता त्यांचा अभिप्राय ऐकायला मिळणार नाही. पत्रव्यवहारही त्यांच्या जाण्याने थांबला. 'हितगुज'च्या एक रसिक, सुजाण वाचक मराठे प्रतिष्ठान विषयी आपुलकी जपणारा कुलबांधव हरपला याची हळहळ आहे. मराठे परिवाराद्वारा कै. श्री.वि.म. मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– संपादिका**

# बडोद्याचे कै. रामभाऊ जोशी - हरहुन्नरी नकलाकार नट

• श्री. रघुवीर (बाबूराव) मराठे (पृ.४२१) भ्रमणध्वनी : ९८७९९१८१८३३

**ब**डोद्यांतील एकही महाराष्ट्रीयन मनुष्य ज्याला रामभाऊ जोशी माहीत नाही असा सापडणार नाही. मी माझ्या लहानपणापासून त्यांना ज्या शरीरयष्टीमध्ये बधितले त्याच्यात यत्किंचित बदल न होता ते ह्या वयांत म्हणजे म्हातारे झाल्यावर सुद्धा तसेच म्हणजे तरुण दिसत होते. आता अशा माणसांना आपण म्हातारे तरी कसे म्हणणार. कारण आपण वाढलेले असतो हे आपल्याला कळत नाही तसे. रामभाऊंसारखा माणूस इतका एनर्जेटिक, उत्साही कसा राहू शकतो हे अगदी गूढ होतं; आमच्या घरी पत्त्याचा क्लब ज्यांचे नांव डायमंड ब्रिज क्लब हा माझ्या वयाच्या ८-९ व्या वर्षांपासून म्हणजे साधारण १९५१ पासून होता तो आमच्या मोठ्या बंधूंच्या लग्नापर्यंत म्हणजे १९५८-५९ पर्यंत होता. सर्व माणसे अगदी हिऱ्यासारखीच होती. चांगल्या घरांतील घरंदाज माणसे.

उदा. डॉ. पेंडसे, श्री. मनोहर सोहंनी, चिनबा कानडे (चिनबा म्हणणं माझा अधिकार नाही पण चिंतोपंत कानडे म्हटलं तर ते स्वतःला पण विसरून जातात.) चिंतोपंत जोशी (भावनगरी), विनायकराव जोशी (रामभाऊंचे मोठे बंधू हे सुद्धा नाटकांत चांगले काम करायचे), आमचे वडील विष्णुपंत मराठे, चिंतुराव सहस्रबुद्धे, लक्ष्मणराव रानडे (रामभाऊंचे साडू), राजाभाऊ लेले, नानासाहेब लेले, मनोहर आणि मधु गाडगीळ बंधू, घंटीवाले जोशी, भालबा जोशी (शाळेचे प्रिन्सिपॉल) अभ्यंकर बंधू हे साधारण माझ्या माहितीतले. असे किती तरी. ह्या लोकांच्या घरातून कुठल्याही प्रकारची तक्रार होत नसावी. किंवा शक्यतो हे लोक बाहेर राहतील तर बरे असं वाटत असावं. ह्यांचे पत्ते खेळणे जे शुक्रवारी रात्रीपासून चालू व्हावयाचे ते सोमवारी सकाळपर्यंत. शुक्रवारी रात्री ११ वाजता कुणाकडून तरी नाश्ता हा ठरलेला असायचा शनिवारी सकाळी. एक एक करून प्रत्येकजण घरी जाऊन आन्हिक उरकून यायचा तसेच रविवारी ते सुद्धा संध्याकाळपर्यंत. ह्यांना जराही कंटाळा म्हणून नांव नाही. दुसऱ्या दिवशी ही सर्व मंडळी पहिल्या दिवसासारखीच ताजी तवानी दिसायची. असं काय टॉनिक घ्यायची कोण जाणे, किंवा हेच त्यांचे टॉनिक असावे.

रामभाऊंची एंट्री म्हणजे चैतन्याचा सुकाळ. एकदम वातावरण बदलून जाणार केव्हाही, कुठेही. ते दिसले की त्यांच्याकडून एखादी नक्कल किंवा किस्सा ऐकावा असेच असायचे. त्यांच्या आयुष्यात त्यांची तीनच दैवते होती ती म्हणजे कै. सयाजीराव, कै. वसंतराव आणि कै. श्रीपाद नारायण राजहंस ऊर्फ बालगंधर्व. ह्या तिघांवर ते इतके सुंदर आणि भावपूर्ण बोलत असत की आपण ऐकतच रहावे. त्यांची विषय खुलवण्याची अशी काहीं हातोटी होती की त्याला कशाचीही उपमा देता येणार नाही.

रामभाऊंच्याबद्दल एक गैरसमज होता किंवा बऱ्याच जणांना अनुभव होता, की ते पैसे काढण्यांत अत्यंत कंजूष आहेत. पण ह्या बाबतीत मी आणि आमचे मित्र कै. दत्ता पटवर्धन (कै. रमेशचंद्र कृष्णचंद्र पटवर्धन ह्यांचे चिरंजीव) दोघांनाही चांगला अनुभव होता. त्या बाबतीत आम्ही अत्यंत लकी, नशीबवान होतो. आम्हा दोघांना हा कंजूषपणा कधीही पाहायला मिळाला नाही. समोरच्या एवढ्या मोठ्या माणसाचा सहवास किंवा कंपनीचा आनंद घ्यायचा असेल तर आपणसुद्धा खिसा थोडा मोकळा करायला काय हरकत आहे. आमच्या बाबतीत ते येतांना कॉफीची ऑर्डर देऊन येताना दोन बिस्किटांचे (एक खारी आणि एक गोड) पुडे घेऊन येत असत. कॉफी आणण्याचे काम आमच्या हाताखालच्या माणसांचे असायचे.

असेच एके दिवशी ते सकाळी १०च्या सुमारास आले आणि म्हणाले, ''आज मला बसायला वेळ नाही कारण मला घरी जायचे आहे कां''? विचारले असता म्हणाले माझा आज वाढदिवस! आमच्या सुनबाई ऑफिसला जायच्या आधी साजरा करणार आहेत. आमच्या मागच्या दुकानाचा एक शिरस्ता असा होता की कुणाचाही वाढदिवस आम्ही संध्याकाळी दुकान बंद व्हायच्या आधी चांगला केक कापून शुभेच्छा देऊन करत असू, त्यामुळे अशा एवढ्या मोठ्या माणसाचा वाढदिवस आपल्याला करायचा चान्स मिळत आहे तो आपण कशाला घालवायचा म्हणून मी माझ्या संजयला तात्कालिक रु.१००/- देऊन त्यावर त्यांचे नाव लिहून आणायला सांगितला आणि त्याने आणला सुद्धा पटकन. ह्याबाबतीत संजय एकदम तल्लख आहे.

आम्ही कधीही मेणबत्ती विझवून वाढदिवस साजरा

करत नाही. सर्व दुकानचा कर्मचारी वर्ग असे गोल उभे राहून टाळ्यांच्या गजरात साजरा केला. ''बाबू, अरे असा माझा वाढदिवस आतापर्यंत कुणीही साजरा केला नाही.'' आणि त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. एवढ्या मोठ्या माणसाचा आपल्याला सन्मान करायला माझ्याच कर्मचाऱ्यांसह मिळाला हे मी भाग्य समजतो. ह्याचे वर्णन मी बऱ्याच ठिकाणी केले तर लोकांना ते खरेच वाटत नव्हते. त्यांच्या डोळ्यांतून कधीही ते पाणी काढू शकतात असे हेटाळणीपूर्वक उद्गार ऐकायला मिळाले.वाईट ह्याचेच वाटते की कौतुक करू नका निदान हेटाळणी तरी एवढ्या मोठ्या कलाकाराची करू नका. तो प्रसंग मी आणि माझा कर्मचारी वर्ग कधीही विसरणार नाही ह्याची मला खात्री आहे.

एकदा असांच एक प्रसंग उद्भवला तो म्हणजे ब्राह्मणसभेच्या निवडणुकीचा निकाल. मतमोजणी होत असताना काहीतरी चूक येत होती आणि निकाल जाहीर करायला वेळ लागत होता. निवडणूक अटीतटीची असल्यामुळे संशय निर्माण होत होता, अशावेळी सर्व जनतेला कसे थोपवून धरायचे हे कळत नव्हते. त्याचवेळी रामभाऊ तिथून जात असताना आमच्या धाकट्या बंधूंनी त्यांना बघितले आणि त्यांना विनंती केली रामभाऊ जरा आंत या आणि जनतेला एक दीड तास जरा थोपवून धरायचे आहे ''ठीक आहे एवढेच ना'' रामभाऊंनी प्रवेश केल्यावर पब्लिक एकदम खुश आणि त्यांनी असे किस्से सांगून सगळ्यांना असे मोहित केले की केव्हा दोन तास निघून गेले कळलंच नाही. तो पर्यंत निकाल तयार होऊन जाहीर सुद्धा सहज करता आला. हे जे त्यांना जमले तसे इतर कुणालाही जमले नसते हा त्यांच्या हातचा मळ होता. हा मनुष्य कुठे नोकरी करत होता हे बऱ्याचं वर्षांनी कळले. ते डिपार्टमेंटसुद्धा त्यांना मजेशीर असंच मिळालं होतं. आरटीओ. त्यांचे साहेब होते पारशी. त्यांना नाटकांचा षौक होता त्यामुळे त्यांचं चांगलंच जमलं होत. ''दिकरा चिंता ना करीस हूं बेठो छू त्यांसुधी कोईना बापानी हिम्मत नही थाय तने हाथ लगाववानी. तू नाटक करतो रेहेजे अही आविने गमे त्यारे सिग्नेचर मारीने जतो रेहेजे'' पण त्याचा त्यांनी कधीही गैरफायदा घेतला नाही. एकेका माणसाचे नशीबसुद्धा त्याला साथ देते. त्यांची बदली राजकोटला झाली तेंव्हा त्यांची प्रसिद्धी अगोदरच त्या खात्यांत झाली आणि साहेबसुद्धा बावाजीच ऊर्फ पारशीच. त्यांत एक गंम्मत म्हणजे त्यांचा शेजारी चिपळूणकरांच्या वाड्यांत राहणारे शेजारी श्री. राजा मुकादम हा नुकताच तिथे लागल्यामुळे त्यांना अगदी घरच्यांसारखेच सगळे होते. तिथेही त्यांनी नाटके न करता नाटकं बसवली. तिथेही त्यांनी त्यांचा ठसा उमटवला. एक किस्सा असा होता श्री. मुकादमांच्या तिथल्या घरच्या अंगणात माकडं भरपूर यायची व नासधूस करायची. राजाच्या आईंची आणि रामभाऊंची ओळख चांगली होती. एके दिवशी हे त्यांनी रामभाऊंना सांगितलं. रामभाऊ म्हणाले ''उद्या आपण भांगेची भजी गरम गरम करून त्यांना खायला घालायची'' आणि तो प्रयोग सक्सेसफुल झाला. माकडं खरोखरोच भोग घेतल्यावर जी अवस्था होते त्याप्रमाणे नाच करू लागली आणि दुसऱ्या दिवसापासून माकडं गायब. ह्या माणसाच्या ह्या अंगभूत गुणाबरोबर दुसरी चांगली गोष्ट म्हणजे हे कीर्तन चांगले करायचे. त्यांच्यामागे झांज झिलायला अत्यंत उत्कृष्ट साथीदार आणि सूचना करणारे असे श्री. बाबूराव सुर्वे असायचे. ज्या माणसाला संगीत म्हणजे काय ते कशाशी खातात ह्याचा सुतराम संबंध नाही पण ॲक्शन अशी करतील की आपल्याला काय सगळ्यांना आश्चर्य वाटेल. वर्णन करण्यांत रामभाऊंचा कुणीही हात धरणार नाही. भरपूर वाचन, दांडगी स्मरणशक्ती तसेच भरपूर कीर्तने ऐकल्यामुळे त्याचा बाज कसा असतो त्याची उत्तम जाण होती. त्यांच्या विनोदी स्वभावामुळे ते नेहमी म्हणत असत सुरुवात चांगली झाली की आख्यान तुम्ही कसलेही रंगवू शकता, एक गमतीदार उदाहरण देत असत. कीर्तनांत आख्यान लावणं सोप्प आहे. ते सांगत असत अरे समजा रामाचा जन्म असेल तर दुपारी जन्म झाला आणि मारुतीचा असेल तर सकाळी झाला, श्रीकृष्णाचा असेल तर रात्री बारा वाजता झाला. मधले सगळे वर्णन एकच ठेवायचे की झालं. त्यांनी मारुतीची कथा बरेंच वर्षे श्री नारायण गुरूंच्या तालमीत केली. तसेच रामनवमीचे कीर्तन लक्ष्मणबुवांच्या मठात मोठे महाराज गेल्यावर करत असत आणि त्यांच कीर्तन म्हटल्यावर बरीच गर्दी व्हावयाची. कीर्तनाचे कुठलेही नियम न मोडता सगळा माहोल उत्तम उभे करायचे. त्यांच्या कीर्तनावर कीर्तन केसरी, कीर्तन सार्वभौम श्री. कै. नानाबुवा सुपेकरांची छटा असायची. त्यामुळे कीर्तन चांगले रंगायचे, त्यांच्या ह्या चांगल्या कार्यक्रमाची उत्तम सांगता त्यांच्या होळीच्या कीर्तनाने कै. श्री मुरलीधरपंत (ऊर्फ डायमंड) जोश्यांच्या स्टुडिओत होत असे.ह्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे हे कीर्तन फार पूर्वी बडोद्यात एक उत्तम कीर्तनकार काळेले म्हणून होते. होळीचे कीर्तन म्हणजे त्यांची हातोटी होती. मोठमोठे कीर्तनकार आपण आलो आहोत हे कळायला नको म्हणून आतल्या खोलीत ती बरीच आधी येऊन बसायची आणि सगळ्यांत शेवटी जायची, त्यांत कै. श्री. नानाबुवा सुपेकर, कै. श्री. कसरेकरबुवा, कै. निगोस्कर बुवा. तसेच बऱ्याच मंदिरांचे महाराज अशी बडी बडी मंडळी असत

हे कीर्तन म्हणजे एक पर्वणीच असायची आणि तेही फक्त एकच दिवस होळीच्या दिवशीच व्हावयाचे. इतर दिवशी ब्र निघायचा नाही. ते कीर्तनकार हे कीर्तन करतच नसत. पण त्या दिवसाचा रंग काही वेगळाच असायचा. पण लोकसुद्धा इतके व्यवस्थित प्रत्येकाला जागा करून देत असत कां तर प्रत्येकाला त्याचा आनंद घ्यायला मिळावा. ह्या कीर्तनाचे आख्यान ''विश्वामित्र मेनका तपोभंग'' हे असायचं. रामभाऊ त्यामध्ये अगदी रंगून जायचे. अभिनय हा मूळ गाभा असल्यामुळे आख्यान रंगलेच पाहिजे. आता पुढच्या वर्षापर्यंत वाट पाहावी लागणार. ह्या कीर्तनाचे रेकॉर्डिंग चार वर्षे जमत नव्हतं. पण एक वर्षी मस्त जमलं आणि तो मजा आम्ही अजून दरवर्षी फक्त त्याचदिवशी ऐकतो.

रामभाऊंच्या बाबतीत अभिनयातली सहजता हा दुर्मीळ गुण आहे उपजत मधुर आवाजासारखीच ती एक देणगी आहे की काय असा प्रश्न पडतो. मी मी म्हणवून घेणाऱ्या नटवर्यांच्यासुद्धा चेहऱ्यावरचा ''मी काय अभिनय करून राहिलोय आहे पहा'' हा भाव लुप्त होत नसतो. रंगभूमीवर शब्दचातुर्याने झगमगणारी वाक्ये फेकून टाळी वसूल करायला उत्तम पाठांतर आणि स्वच्छ वाणी एवढे भांडवल पुरते. अद्भुतरम्य किंवा ऐतिहासिक नाटकांत असल्या आतषबाजीला खूप वाव असतो पण ''जरा तो पाण्याचा तांब्या द्या हो इथे'' यासारखे सोपे वाक्य नाटकांत म्हणताना ते नाटकातले वाक्य नसून खरेच त्या पात्राला पाणी हवेय असे वाटायला लावणे मुश्कील असते. संवादांत साधी वाक्ये लिहून इष्ट परिणाम साधणे हे नाटककाराला जितके कठीण असते तितकेच ते त्या तसल्याच साधेपणाने हजार प्रेक्षकांना पोहोचवणे कठीण असते. रामभाऊंनी हे काम तितक्याच जबाबदारीने केले, कितीही संवाद मोठे असले तरी त्यावर त्यांनी हुकूमत गाजवून नाटक यशस्वी केले. वक्तशीरपणा हा त्यांचा अंगभूत गुण होता. नाटकाच्या तालमी वेळेवर सुरू झाल्याच पाहिजे, नाटकाचा पडदा नक्की केलेल्या वेळेंत वर गेलाच पाहिजे. त्यामुळे मुख्य पाहुणेसुद्धा अगदी वेळेच्या आधी उपस्थित असत. ह्या बाबतीत वक्तशीरपणा हा त्यांच्या गुरुवर्यांकडून घेतलेला गुण आणि आत्मसात केलेला सुद्धा... नाहीतर घोषणा करणारे पुष्कळ असतात. आपले बोलणे विनोदी करायला त्यांना कसलीही युक्ती वापरावी लागत नाही की हातवाऱ्यांचा आटापिटा करावा लागत नाही. सहजता नसलेले कॉमिक पार्टी प्रेक्षकांना आव आणत असतात. रामभाऊंमध्ये ही सहजता होती. बबन प्रभूमध्ये होती. वसंतराव भोंडे त्यांचे सहकलाकार ह्यांच्यांत होती विनोदी भूमिका करताना निराळ्या दृष्टीने कस लागतो कारण इथे प्रेक्षकांच्या नादी लागण्याचा मोह अनावर असतो. विनोदी नट आणि संगीत नट-नटी प्रेक्षकांच्या आहारी जाऊन नाटकाचा कधी बट्ट्याबोळ करतील हे सांगणे अवघड! एखादे गाणे विनाकारण ह्या रागांतून त्या रागांत एखाद्या नाठाळ जनावरासारखे खेचत नेणाऱ्या संगीत नट किंवा नटीप्रमाणे जणू काय नाटककाराने लिहिलेला विनोदी संवाद पुरेसा हशा पिकवणारा नाही ह्या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात -नको त्या ठिकाणी नको तितके अंगविक्षेप करतात. रामभाऊंना असल्या अघोरी उपायांनी हशे पिकवण्याची कधी गरजच भासली. नाही त्यांचा रंगभूमीवरचा वावर त्यामुळे कधीही आगाऊ किंवा विसंगत वाटला नाही. त्यांच्या हाताखाली एका तरुण गायकाने नाटकात काम केले होते. बडोद्यांतील हा त्यावेळेस चांगला गाणारा. स्वतः तो नेहमी भजनात गात असल्यामुळे आपण मारलेल्या भजनी ताना संगीत नाटकांत सुद्धा चालतील असा त्याचा समज होता. त्यामुळे त्याचा मोह काही सुटायचा नाही आणि नेहमीप्रमाणे आपण मठात किंवा मंदिरांत आहोत असे प्रेक्षकांना वाटायला लागायचे. एकंदरींत काय स्वतःवर ताबा असणे हे जरुरीचे. त्याच मुलाकडून ''कट्यार काळजांत घुसली'' एका नव्या उमेदीच्या दिग्दर्शकाने नजरेच्या इशाऱ्यावर खाँसाहेबांची भूमिका उत्कृष्ट करून घेतली. एकदा त्यांनी आग्र्याहून सुटका ह्या नाट्यप्रयोगातील गंमत सांगितली. ते म्हणतात आम्ही हे नाटक बसवायला घेतले. त्यांत नुसता संवाद न करता खरा घोडा स्टेजवर आणायचं नक्की केलं. आणि एकदोन वेळा घोडा आणून चांगलं जमलं. पण गंमत म्हणजे ऐनवेळी स्टेजवर घोडा यायला तयार नाही, कसा बसा लगाम धरून खेचून आणला तर घोड्याने नको तो प्रकार स्टेजवर केला. आता ही वेळ अशी होती आणि तेवढ्यात लगाम धरलेल्या माणसाने महाराजांसमोर तो यायला घाबरत आहे'' असं म्हणून प्रसंग मारून नेला, पण हे वर्णन त्यांनीच करावे.

रामभाऊंना सगळे लाइटली घ्यायचे. पण त्यांचे डायरेक्शन अत्यंत उत्कृष्ट असे. त्यांनी संशयकल्लोळ, भावबंधन, तुझे आहे तुजपाशी, खडाष्टक अशी बरीच नाटके बसवली. मुंबई नाट्य स्पर्धेत त्यांना कायम बक्षिसे मिळायची. आमच्या बहिणींपैकी धाकट्या बहिणीने भावबंधनात इंदूची आणि तसेंच खडाष्टकमध्ये गर्गेशाच्या भूमिकेत काम केले होते आणि एंट्रीला हमखास टाळ्या घेत असे. आमचे चिरंजीव सुधन्वाला शारदा नाटकांत शारदेच्या भावाचं काम लंगोटी घालून स्टेजवर यायचं होतं. पण ''मी लंगोटी घालून येणार नाही'' असे सांगून त्याने काम करण्यास नकार दिला. संशयकल्लोळाला आमच्या मोठ्या बंधूंनी

ऑर्गनची साथ केली होती. रामभाऊंना गळ घालणारे पुष्कळ होते. ज्यांचा नाटकाशी सुतराम संबंध नाही अशा लोकांनी त्यांना आपल्याला रामभाऊंच्या नाटकांत काम करायचेच आहे ह्या जिद्दीने व ते प्रेमाने सांगत असत. त्यांत त्यांचे खास श्री. बाबुराव सुर्वे आणि आमचे वडील कै. विष्णुपंत ऊर्फ शेठ हे होत. बाबूरावांनी त्यांना म्हटलं, ''राम माझी शेवटची इच्छा तुझ्या नाटकांत काम करायची आहे. कुठलंही काम दे पण संवाद म्हणायचे सांगू नको. मोठी पंचाईत पण रामभाऊंनी शक्कल लढवून त्यांना तुझे आहे तुजपाशीमध्ये ड्रायव्हरचे काम ज्यांत नुसते पांढरे कपडे घालून यायचं आणि वाकून नुसते चालण्याचा आविर्भाव करायचा. आणि ते त्यांनी अगदी उत्तम काम केले. तसेच आमचे वडील. ''अहो शेठ, मी काय तुम्हाला काम देणार?'' अहो केव्हाही द्या मला घाई नाही आणि रामभाऊंनी 'जेंव्हा मोठे मासे आणि छोटे मासे' ही नाटिका घेतली त्यांत त्यांना एका ब्राह्मणाची भूमिका दिली. संध्याकाळी भीमरूपी म्हणत बागेतून प्रेमी युगुलांकडे बघत बघत जायचे. पण ते काम त्यांनी चांगले केले.

प्रत्येक रविवारी डायमंड जोश्यांच्या स्टुडिओत रात्री सर्वजण जमत असत. प्रत्येक जण काय वाचलं त्यावर चर्चा करत असत ह्या माणसाचे दांडगे वाचनच नुसते नव्हते तर ते पॅराग्राफचे पॅराग्राफ बोलून दाखवत असत. त्यांचे बोलणे नुसते ऐकत राहावे असे वाटे. त्यांची ओघवती भाषा आणि सांगण्याची पद्धत एकदम छान असायची. एकदा त्यांनी भावबंधनमधला दोन पानी संवाद म्हटला. दर रविवारी जमत असू म्हणून संडे क्लब. किती किती मोठी लोकं ह्यामध्ये सहभागी होत असत. त्यांत रामभाऊंची हजेरी म्हणजे गप्पा आणि वादविवाद ह्याचा संगम. प्रत्येकजण त्यांचा मान राखून असायचा. ह्यामध्ये काही नवीन तरुण मंडळींची भरती झाली. आपल्या वयापेक्षा मोठ्यांचा मान राखण्यात ही मंडळी कमी पडली. लहान माणसाने भले तो कितीही श्रीमंत अथवा सोशल कामे करणारा असो त्याने समोरच्या आपल्यापेक्षा किती तरी पावसाळे जास्त बघितलेल्या माणसाची मस्करी करणं हेच मुळी त्यांच्या बुद्धिमतेचं प्रदर्शन करण्यासारखे आहे अथवा लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखे आहे जे बाकी कुणालाच पसंत नव्हते. त्याचा निषेधसुद्धा सगळ्यांनी केला पण तो आघात रामभाऊंच्या एवढा जिव्हारी लागला आणि क्लबला नाट लागून त्याचे पर्यवसान बंद होण्यात झाले. रामभाऊ नाही म्हणजे क्लब हा जीव नसलेलं शरीर...

रामभाऊंना एकच मुलगा. तो बँकेत असून तो रंगकर्मीची कामे करतो. रामभाऊंचे साडू कै. लक्ष्मणराव रानडे हे सुद्धा चांगले काम करत. ते स्वतः उत्तम घड्याळजी होते. त्यांचे मोठे बंधू विनायकरावसुद्धा त्यांचे बरोबर नाटकांत काम करत असत. पुष्कळ नाटकं बसवली आणि त्यांनी बरोडा अमॅच्युअर्स ड्रॅमाटिक क्लबच्या नावाखाली 'महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवां'त पहिल्या दुसऱ्या नंबरची बक्षिसे पण पटकावली. एकदा एक नाटक घेऊन ते मुंबईला जाणार होते. जाणारा संच हा ५० जणांचा होता. एवढ्या सगळ्यांची व्यवस्था करायची म्हणजे एक मोठ्ठ काम, एक नामी युक्ती त्यांनी केली.

कै. श्रीमंत फतेहसिंगराव महाराजांचं अतिशय प्रेम त्यांच्यावर होतं आणि त्यांचंही. त्यांच्यासमोर ते अशा काही चेहऱ्यानी उभे राहून त्यांना वाकून कुर्निसात करून उभे राहिले की त्यांनी विचारलंच ''कां हो रामभाऊ! आज असा का चेहरा दिसतो आहे?'' लगेच त्यांनी सांगितले, ''महाराज आपल्या क्लबला नाटकासाठी पुन्हा मुंबईला बोलावलं आहे, फायनल राऊंडसाठी. आणि एवढ्या सगळ्यांची व्यवस्था आपल्यालाच करायची असते आणि एवढ्या शॉर्ट नोटीसमध्ये हे कठीण आहे.'' श्रीमंत महाराजांनी लगेचच त्यांना ''रामभाऊ, काळजी करू नका, आपल्याला बक्षीस मिळालेच पाहिजे, तुमच्या सगळ्यांची उत्तम व्यवस्था मलबारहिलवरील राजवाड्यांत होईल'' आणि रामभाऊंनी निश्चिन्त मनाने जाऊन पहिला नंबर मिळवला. कुणाला कसं पटवायचे ही कला त्यांना उत्तम अवगत होती.

वर्षातून एकदा सर्वजण बडोद्याजवळील कर्नाळीला पत्ते खेळायला जात असत. एवढा प्रचंड उत्साह त्या सर्व म्हाताऱ्या माणसांत दिसायचा. पहाटे उठून सगळे बस स्टॉपवर भेटत असंत आणि तीन दिवसांनी परत येत असंत. आमचे वडील त्यांत जात असंत. त्यांची सगळी व्यवस्था मी करत असे. एक मिलिटरी बॅग, त्यांत एक धोतर, पंचा, तांब्या आणि आवडती नारळाची चटणी. मी त्यांना वाटून देत असे. जास्तीत जास्त आनंद घेण्याचा नेहमी त्यांच्या क्लबचा प्रयत्न असायचा. वैद्य, पटवर्धनांच्या वाड्यावर ती सर्व मंडळी उतरत. देशपांडे महाराजांच्या पत्नी जेवणाची व्यवस्था निरपेक्षभावाने बघत असे. मूलबाळ नसल्याने ते कुटुंब निवृत्त होऊन तिथे रहात असे.


एकदा श्री. प्रभाकर दात्यांच्या षष्ठ्यब्दीपुनिमित्त ब्राह्मणसभेत जेवायला जाऊन आले आणि रात्री त्यांना अचानक बरे नाहीसे वाटायला लागले आणि मध्यरात्री त्यांची प्राणज्योत मालवली. एका हरहुन्नरी आणि प्रत्येकाला आवडणाऱ्या अशा ह्या महान नटाच्या पावलांची स्वर्गाकडे जाण्याची आणि वरील सर्व देवांना रिझवण्यासाठी वेळ घेऊन हा नट तिकडे पृथ्वीतलावरील सर्वांना आपलंसं करून मार्गस्थ झाला. त्यांना शतशः प्रणाम. ♦



# रिठ्याचे औषधी गुणधर्म

- अंगाचा दाह होत असल्यास रिठ्याचा फेस अंगाला चोळल्याने आराम वाटतो.
- पोटात कृमी झाल्याने लहान मुलांचे पोट सतत दुखत राहते अशा वेळी पाव ग्रॅम रिठ्याचे टरफल गुळातून घाटवल्यास कृमी पडून जातात.
- कफ चिकटून राहात असल्यास तोंडात रिठा धरून थोडा थोडासा गिळत राहिल्यास कफ पातळ होतो आणि पडून जातो.
- मनुष्य फेफरे येऊन पडल्यास रिठे उकळवलेले पाणी नाकात सोडणे हा उत्तम उपाय आहे.
- कोणत्याही प्रकारचे विष पोटात गेले तर रिठ्याचे पाणी प्यायला द्यावे. यामुळे उलटी होते आणि विष उतरते.
- मसालायुक्त शिकेकाई करताना रिठे वापरले जातात. त्यामुळे नैसर्गिक कंडिशनरचे काम होते.
- रिठे-भिजत घालून त्या पाण्यात सोन्याचे अथवा चांदीचे दागिने भिजवून ठेवल्यास चिकटलेला मळ निघून दागिना स्वच्छ व चमकदार होतो.
- रिठे पाण्यात भिजवून ते चांगले कुस्करून पाणी अंगाला चोळल्यास अंगावर पित्त उठण्यास त्रास कमी होतो.
- अकस्मात मूत्र कोंडले असता खारकेची बी आणि रिठ्याची बी पाण्यात उगाळून ओटीपोटाच्या सभोवती लेप लावावा आणि शेक द्यावा. यामुळे लघवी साफ होते.

---



श्री स्वामा समर्थ जय जय स्वामी समर्थ।
सद्‌गुरू स्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ।
स्वामी समर्थ स्वामी समर्थ बोला हे नाम।
जातील सारी दुःख निघोनी सापडेल वाट।।
स्वामी असती सदा पाठीशी दाखविण्या मार्ग।
हाक देऊनी पहा तुम्ही हो स्वामींना आज।।
अक्कल कोटी असे निवास त्यांचा हो खास।
परी भुवरी सुक्ष्म रुपाने करीती संचार।।
स्मरा तुम्ही हो स्वामी समर्थ, स्मरा दिगंबर।
रूप स्वामींचे घेऊन येती दत्तगुरू महाराज।।
देती चापट, करीती शिक्षा चुकता आम्ही मार्ग।
परी दाखवूनी वाट, करीती ते आम्हास मार्गस्थ।।
शुब्दचित्ती एकाग्र होऊनी नामस्मरा नित्य।
तरुन जाण्या हा भवसागर, देतील ते हात।।
अगाध महिमा स्वामींचा हा, अगाध महाराज
नमस्कार मी करीते संध्या, देई आशीर्वाद।।

– **संध्या खांबेटे** (पृ. ६२६), ठाणे

# बोलकं अंगण

• सुनंदा अरुण मराठे (पृ.२१), कणकवली भ्रमणध्वनी : ८६०५९९१०९५

एका निवांत संध्याकाळी मी उंबरठ्यावर उभी असतांना कुणीतरी माझ्याशी बोलण्याचा भास मला झाला. घरात आम्ही दोघंच व हे तर बाहेर काही कामाच्या निमित्ताने गेले होते, तर मग कोण बोलतंय? मन थोडसं घाबरलं पण मग पुढचं वाक्य ऐकलं व मग ऐकतच राहिले.

अगं तू दाराच्या उंबरठ्यावर उभी का? ये इकडे माझ्याबरोबर बस. आपण बोलू काही सुखाच्या गोष्टी. कोण बोलत होतं काही कळेना पण माझे पाय आपसूकच अंगणाकडे वळले. आवाज आला, बस इथे, कितीतरी दिवस माझ्या मनातलं तुझ्याशी वाटून घ्यावं, तुझ्याशी हितगुज करावं असं वाटत होतं तर आता छान वेळ आहे, बोलू आपण. कोणी पाहुणे मंडळी किंवा अनोळखी व्यक्ती आली तर माझ्याकडे पाहून त्याला अंदाज येतो, म्हणजे चपला येथे दिसतात, कपडे वाळत घातलेले दिसतात, माझा परिसर स्वच्छ दिसतोय म्हणजे घरात कोणीतरी आहे हे कळून येते पाहुण्यांना व नंतर तुमच्या भेटीमध्ये माझं गुणगान गायलं जातं व तेव्हा मला मी भाग्यवान असल्याची जाणीव होते. सगळेजण म्हणतात किती स्वच्छ परिसर आहे, समोरील तुळशी वृंदावन किती मनमोहक व आकर्षक वाटतंय. मग माझ्या सभोवती असलेल्या बागेचं वर्णन झोपाळ्यावर बसून, चहाचा घोट घेत घेत केलं जातं. सुंदर व आकर्षक फुलांची बाग, तसेच औषधी झाडांची केलेली लागवड, त्याचं वर्णन तसेच फळांच्या झाडांची पण नामावली घेतली जाते. त्यामुळे मला पण माझ्या सौंदर्यात भर पडल्याची जाणीव होते. घर पश्चिमाभिमुख असल्याने अंगणात सतत हवा खेळती रहाते. वारा भरपूर मिळतो. समोरच रस्ता असल्याने वाहनांची वर्दळ तसेच माणसांची ये-जा सतत सुरू असते. यांच्या जोडीला असते पक्ष्यांची लगबग. खारुताई सतत लगबगीने इकडेतिकडे करत असते, विविध प्रकारच्या पक्ष्यांची जत्राच असते व जोडीला मनीमाऊ. खूप सोबत होते या सगळ्यांची. तुम्ही घातलेल्या मंडपामुळे माझ्यासह घराची शोभा वाढली आहे. खरंतर तुम्ही मंडप कायमस्वरूपी घालणार नव्हतात, उन्हाळ्यात मला शेणाने सारवण्यात तुम्हाला खूप आनंद मिळणार होता, व ते मलाही आवडले असते. परंतु तुमचा सुद्धा इलाज नव्हता. दरवर्षी मंडपाचे सामान, मजुरांकडून अंगण करून घेणे हे सर्व दुरापास्त होत गेल्यामुळे तुम्ही हा मार्ग स्वीकारला व काळाप्रमाणे बदल केलात, ह्यातच मी समाधान मानलं. वरील मजल्यावर खोल्या काढून सोबत व्हावी या उद्देशाने भाडेकरू ठेवण्याचा निर्णय घेतलात व वरती जाण्याचा मार्ग म्हणजे जिना हा माझ्या लगतच ठेवल्याने मला भेटल्याशिवाय कोणीच पुढे जाऊ शकत नाही.

मला आठवतय, १८ वर्षांपूर्वी या वरच्या खोल्या बांधल्या नंतर पाटील कुटुंबीय येथे रहाण्यास आले व ते तुमच्या घरचेच होऊन गेले. भाग्यश्रीला बालवाडी सुरू करायचे मनात आले तसेच शिकवण्याही घ्यायच्या होत्या, तेव्हा त्याची चर्चा माझ्या साक्षीनेच तुम्ही उभयता केली व तुम्ही होकार देऊन त्यांना प्रोत्साहन दिले व कार्यवाही सुरू झाली. पाटील कुटुंबीय म्हणजे संदीप-भाग्यश्री व त्यांची गुणी मुले तेजस व जुई, सदा प्रसन्न, कष्टाळू व नवनिर्मितीचा ध्यास घेतलेली असल्याने तसेच त्यांच्या उपक्रमशील स्वभावामुळे दिवसाला १००च्या आसपास मुलांची त्याचबरोबर पालकांची वर्दळ सुरू झाली व मी सुखावून गेले. माझ्याकडे पादत्राणांचा खच पडू लागला व मी खऱ्या अर्थाने श्रीमंत झाले. येणारे पालक माझ्या आवतीभोवतीचे निरीक्षण करत आनंद घेत असत. बालवाडीच्या मुलांचे स्नेहसंमेलन, विविध वेशभूषा स्पर्धा, दहीहंडी अशा अनेक कार्यक्रमांचे नियोजन माझ्या सोबतच केले जात असे. जिन्यावरून खालच्या बाजूला छोटसं व्यासपीठ तयार केले जाई व त्यावर लहानलहान मुलं नटून थटून आपल्या कला सादर करत. पालकांना बघितल्यावर ती रडत म्हणून पालक तुमच्या घरातून, खिडकीतून कार्यक्रमांचा आस्वाद घेत असत व तृप्त होऊन जात. याचसोबत काही धार्मिक कार्यक्रम देखील माझ्या साहाय्याने तुम्ही आयोजित केले होते. तुमचा नातू श्रेयस व पाटील यांचा मुलगा तेजस यांच्या मुंजी, पणतू भोजन, असे कार्यक्रम खूप झोकात पार पडले व त्याला मी साक्षी आहे. अशा कार्यक्रमांना तुमचे सगळे नातेवाईक तसेच शेजारी उपस्थित होते. यावेळी भोजनाचा थाटही माझ्यासहच झाला व नंतर सगळे तृप्त मनाने तुमच्यासह पाटील कुटुंबीयांचेही गुणगान झोपाळ्यावर बसून करत होते, त्यामुळे मीही सुखावले गेले. ती. रा.रा. भाईकाका कुळकर्णी तुमच्याकडे येत असत, ते तर माझ्या प्रेमातच पडले होते व तुमच्या परवानगीने एक कार्यक्रम देखील ठरवला व त्याचे भाडे देखील देऊ केले, मात्र

तुम्हाला माझा व्यावसायिक वापर करायचा नसल्याने तुम्ही त्यांचेकडून भाडे घेण्यास नकार दिला व त्यामुळे मी सुखावले. त्यांनी ३०/४० वकिली शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यासवर्ग घेतला, मुंबई, पुणे येथील हे शिकाऊ वकील होते व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मान्यवर वकील उपस्थित होते. भरगच्च कार्यक्रम झाला. तुमचे शेजारी व स्नेही प्रसाद घाणेकर यांनी देखील खूप सहकार्य केले. न्याहरी तसेच जेवण यादव वहिनींनी बनवून दिले. भोजन अतिशय चविष्ट असल्याची पावती उपस्थितांनी दिली. सर्वजण खूप खूश झाले व तुमच्यासह माझीही मुक्तकंठाने प्रशंसा केली. दररोज माझ्या पायरीवर तुम्ही छानशी रांगोळी घालता त्यामुळे मला खूप आनंद मिळतो व समाधान मिळते. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते तेव्हा मोठ्या रांगोळ्या देखील घालता. उन्हाळ्यात तर घरामध्ये खूप गरम होत असल्याने तुमचा बराचसा वेळ माझ्यासोबतच जातो, याचबरोबर उन्हाळ्याची वाळवणे असतात, त्यांची राखण करणे, ऊन पुढे गेले की जागा बदलणे यात तुमच्यासह माझाही वेळ मजेत जातो. दरवर्षी वृंदावनाचे लग्न मी अनुभवते, तसेच गुढीपाडव्याच्या दिवशी गुढीदेखील माझ्यासहच उभारली जाते. उन्हाळी सुट्टीत तसेच गणपती उत्सवात तुमची सुना, नातवंड तसेच मुलं आवर्जून येतात व त्यांचा बराचसा वेळ माझ्या सान्निध्यातच जातो. पत्ते खेळणं, शेकोटी करणे, भेंड्या, गाणी, गप्पा सगळं येथेच चालतं. तसेच नातवंडे लहान होती त्यावेळी सायंकाळी परवचा म्हणणं तसेच आजोबांचे पाढे शिकवणे, तसेच खांबांचा खेळ व इतर अनेक खेळ येथेच पार पडतात. माझा ऊर भरून येत असे. गणपती बाप्पाचे आगमन प्रथम माझ्याकडेच होते, तेथून मग घरामध्ये आगमन, प्राणप्रतिष्ठा, पाच दिवस विविध पंचपक्वानांचे दरवळ तसेच आरत्यांचा आवाज यांचा आस्वाद मी घेत असते, व शेवटी विसर्जनाच्या दिवशी पूजा, आरती, गाऱ्हाणं घालून मग बाप्पाला माझ्याच बाजूला बसवलं जातं व नंतर पर्यावरणाचा विचार करून बागेतच पिंपामध्ये मोठ्या सद्गदित वातावरणात विसर्जन केलं जातं, त्यावेळी तुमच्यासह मीही उदास होते मात्र क्षणभरच, व नंतर प्रसाद वाटप करून गप्पा सुरू होतात व वातावरण नेहमीचे होते.

माझ्या आजूबाजूला सकाळ, संध्याकाळ बुलबुल, चिमण्या, खारुताई बागडत असतात, येथेच आसपास सुरक्षित जागी घरटी बांधतात, अंडी घालतात, पिलांना जन्म देतात, नंतर त्यांची चिवचिव ऐकून सगळ्यांची मने प्रसन्न होतात. या पिल्लांना पंख फुटले की जातात उडून, असं हे जीवचक्र सुरू असतं. भटकी कुत्री, मांजरं देखील रात्री माझ्याच आश्रयाला येतात, व अशाप्रकारे 'हे विश्वची माझे घर' याची प्रचिती येते. जसे हे पक्षी पंख फुटले की उडून जातात तसेच वरील मजल्यावर रहात असलेले पाटील कुटुंबीय पुढील संधीचं सोनं करण्यासाठी येथून दूर गेले, तसेच त्यानंतर आलेले तेंडुलकर कुटुंबीय वर्षभरातच बदलीमुळे गोव्यात गेले व त्यानंतर रहात असलेले नागावकर कुटुंबीय सुद्धा स्वभावाने, वागणुकीने अतिशय चांगले तसेच स्वच्छ, मनमिळाऊ वागणुकीने तुमच्यासह मलाही जिंकून घेतलं. तुमच्यासह गप्पा, चर्चा व तुमची कायम आपुलकीने चौकशी करतात, खूपच, प्रेमळ सहवास, तुम्हाला व मलाही मिळतो, त्यांना तसेच आपणा सर्वांना चांगले आरोग्य लाभो अशी प्रार्थना करून माझं हितगुज पुरे करते, आता जय श्रीराम म्हणत तू आपल्या कामाला लाग, बाहेरची काळजी माझ्यावर सोड. अच्छा, जय श्रीराम.

♦




## आगामी मराठी दिनानिमित्त

मराठी आमुची जणू सौंदर्याची खाण

अनेक रूप अनेक रंग; समृद्धीची बहार

वेशीनुसार बदलते ढंग; ओळख बने त्या गावाची

शब्दांचे भांडार जणू; उधळी मुक्त हस्तांनी

वाटे अवघड; परी भासे गोड

कधी बने कट्यार; कधी मुलामा थोर

– **संध्या खांबेटे** (पृ. ६२६), ठाणे

# एक अद्‌भूत प्रेम कहाणी

• श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ.३८०), बडोदे भ्रमणध्वनी : ०२६५/२४२३०५५

दुसऱ्या महायुद्धांत झालेल्या बॉम्बवर्षावात जबर जखमी होऊन हॉस्पिटलात दाखल झालेल्या एका उच्च अधिकारी - मि. मिल्नेने एक हृदयस्पर्शी आणि तितकीच रोमांचक कथा लिहिली आहे. १९३९च्या सप्टेंबर महिन्यात जेव्हा त्याने हॉस्पिटल सोडले तेव्हा पण तो पूर्णपणे स्वस्थ नव्हता व मानसिकरीत्या तो खूपच अस्वस्थ होता त्याच वेळी त्याच्या आयुष्यात ही घटना घडली.

एका रात्री त्याने स्वतःच्या मनावरचा ताण हलका करण्यासाठी मित्राला ऑपरेटरमार्फत फोन लावला. त्याकाळी मोबाईल/सेलफोन तर सोडाच पण साधा फोन देखील ऑपरेटर मार्फतच लावावा लागत असे. फोन तर लागला पण समोरून कोणी अनोळखी व्यक्ती ऑपरेटरला सांगत होती. ''माझा ग्रासनंबर रद्द करा. मला हँम्पस्टीनचा नंबर हवा होता त्याऐवजी चेल्सीचा नंबर लागला आहे. समोरच्या फोनवरच्या व्यक्तिची मला दया येते. इतक्या रात्री उशीरा माझ्या सारख्या अपरिचित व्यक्तिचा फोन घेण्यास ती व्यक्ति आपला वेळ कशाला बिघडवेल?''

कुणी स्त्री बोलत होती, परन्तु मिन्लेने लगेचच म्हटले ''काही हरकत नाही. मी आपणाशी बोलण्यास उत्सुक आहे त्यामुळे माझा वेळ बिघडण्याची तुम्ही काळजी नका करू'' समोरून त्या स्त्रीचा प्रतिभाव सकारात्मक होता आणि फोनच्या घोटाळ्यावर ती हसून राहिली होती. दोन-चार वाक्यातच त्यांचा संवाद संपला, परंतु तिच्या आवाजाने भारावलेल्या मिन्लेने पून्हा त्या स्त्रीला फोन केला आणि आश्चर्य म्हणजे पूर्ण २० मिनीटे त्यांच्या गप्पा झाल्या. मिन्लेने विचारले ''एवढ्या रात्री तुम्ही कुणाला फोन करीत होता?'' प्रत्युत्तरादाखल ती म्हणाली ''माझ्या वृद्ध आईला अनिद्रेचा रोग आहे त्यामुळे नेहमीच रात्री-अपरात्री तिच्याशी बोलते'' फोनवरच्या गप्पा संपताना मिन्ले म्हणाला ''मी इतकी गोड वाणी कुणाचीच ऐकली नव्हती'' परंतु समोरुन ती स्त्री म्हणाली- अस्वस्थतेने म्हणली ''आता गप्पा मारून तितका आनंद वाटत नाही गुडनाइट''

दुसऱ्या दिवशी मिन्लेच्या कानात संबंध दिवस त्या स्त्रीचा आवाज घुमत राहिला कारण तिचा आवाज स्पष्ट होता आणि तिच्या आवाजात एक विशिष्ट प्रकारचा गोडवा. तो मधुर मनमोहक आवाज ऐकण्यास तो आतूर होता.

त्याचे मन मध्यरात्रीची वाट पाहू लागले. त्याचा फोन नं ८८९९ आठवून शेवटी त्याने न राहवून फोन जोडला. समोरून 'हॅलो'चा आवाज आला. मिन्ले म्हणाला ''त्या रीतीने तुम्हाला कंटाळा /त्रास दिल्याबद्दल 'सॉरी' परंतु तुमची हरकत नसेल तर आपण आपल्या गप्पा पुढे चालू ठेवू.'' मग आदल्या रात्रीच्या बोलण्यात अर्धवट राहिलेल्या तिची कझिन 'बेटी' हिच्याबद्दल चर्चा झाली आणि काही मिनिटांतच दोघे जणू काही खूप जुने परिचित आहेत असे झाले. त्यानंतर ४५ मिनिटे त्यांच्या गप्पा झाल्या. मिन्लेने हलक्या आवाजात विचारले ''आपण तर एकमेकांची नावे पण जाणत नाही. थोड्या नावांचा परिचय झाला तर बरे'' परंतु स्त्रीने तिचे नाव सांगण्यास नकार दिला. त्यानंतर परिचयामुळे त्यांची मैत्री खूप गाढ झाली. संवादाच्या ओघात मिन्लेला कळले की त्या स्त्रीचे लग्न तिच्या अवघ्या सतराव्या वर्षी झाले होते. तसेच तिचा पति खूपच भांडखोर असल्याने तिला सोडून गेला होता. त्यांचा एकूलता एक मुलगा १८ व्या वर्षी सैन्यात दाखल झाला आणि तो विमान दुर्घटनेत मृत्यु पावला होता. सध्या ती ३६ वर्षाची होती. मुलाविषयी चर्चा करताना ती खूप हळवी/ भावनावश होवून गंभीरपणे बोलत असे. तिच्या एकंदर बोलण्यावरून ती अशा परिस्थिती जीवन जगणारी पण आंतरिक सौंदर्य कधीही विसरू न शकणारी अशी स्त्री वाटल्याने मिन्लेच्या मनावरची तिची छबी अधिकच गाढ झाली.

एके दिवशी फोन वरून तिला म्हणाला ''मी तुमची छबी नजरे समोरून हरवू शकत नाही'' ती फोनकरून म्हणाली- हसून म्हणाली ''तुम्ही कसं जाणलं की मी सुंदर आहे?'' पण मिन्लेजवळ त्याचे उत्तर नव्हते.

ह्याप्रमाणे बिलकूल अजाण पात्रांची प्रेम कहाणी चालू होती. पुस्तकांच्या एकमेकांच्या वाचनाने त्यांच्यां लक्षात आले की दोघेही एकवेळ comman liabrary चे मेंबर होते. लायब्ररी मध्ये पण एकमेकांची नाव जाणण्याचा निष्कळ प्रयत्न केला होता. काही काळाने मिन्लेनी खूप आग्रह केला म्हणून ती नाव सांगण्यास सहमत झाली मात्र सांगीतले नाही. त्यांचे दर रात्री आपासात फोनवर बोलणे होऊ लागले.

मिन्ले तिला ''आत्ताच टॅक्सीने तुला भेटायला येतो'' असे म्हणताच ''असे करू नका'' ''कारण मला भेटल्यावर कदाचित तुम्हाला वाटेल की आपण एकमेकांस पात्र नाही आहोत''

असा तिचा प्रतिसाद होता. काही वेळा बॉम्बवर्षाव झाल्यावर फोनकरून मिन्सेला येथे मी सुखरूप आहे. सुरक्षित आहे असे कळवित असे. ह्या प्रमाणे एक वर्ष पर्यंत त्या दोघांना प्रेम संबंध फुलला होता. एक दिवस लहान खेडेगावातून परतल्यावर मिन्लेने तिला लंडनला फोन लावला, परंतु समोरून प्रत्युतर न आल्याने कदाचित फोन बिघडला असेल असा समज त्याने करून घेतला. पण त्याला चैन पडेना. दुसऱ्या दिवशी रात्र पडताच पुन्हा त्याने फोन लावला पण फोन वर विचित्र आवाज आला म्हणून मिन्लेने फोनवर ऑपरेटरकडे ग्रासनंबर ८८९९चे नाव पत्ता जाणण्याचा प्रयत्न केला. परंतु टेलिफोन कंपनीने नकार दिला. कारण ते कंपनीच्या नियमाविरूद्ध होते. शिवाय ती सुचना तिच्या भांडखोर नवऱ्यामुळे कंपनीला मिळाली होती. अखेर एका स्त्री ऑपरेटरने त्याची विनवणी ऐकली व ती म्हणाली ''आमच्या कायद्याची मनाई आहे तरी सुद्धा मी तुम्हाला मदत करते कारण तुम्ही ज्यांचा पत्ता मागत आहात त्या घरावर तीन दिवसापूर्वी बॉम्ब हल्ला झाला व ते घर संपूर्ण नाश पावले. म्हणून आता घराचा पत्ता देण्यास कायदा आड येवू शकत नाही.'' ''नकाच देवू पत्ता'' मिन्ले म्हणाला आणि ते नावही मला सांगू नका. आपले खूप आभार! एवढे बोलून मिन्लेने फोन ठेऊन दिला. ♦



## माझ्या सासूबाई - एक व्यक्ती - अनेक आठवणी

माझ्या सासूबाई कै. सुगंधा ल. मराठे पूर्वाश्रमीच्या नलिनी बा. बर्वे सावर्डे. त्यांची सून म्हणून जे जे काही त्यांच्या भावंडाकडून माझे पती श्री. अजित ल. यांच्याकडून ऐकले आणि माझे लग्न झाल्यापासून आठ वर्षांच्या अल्प काळात जे अनुभवले ते.

ठेंगू ठुसकी, गोरी, घारी, शांत अशी मूर्ती म्हणजे माझ्या सासूबाई. विविध फळांची लोणची, फणसाचे पापड, अननसाचे सासव इ. गोव्यातील विविध प्रकार बनवण्यात त्यांचा हातखंडा होता. त्या शिवणकाम, भरतकाम, विणकाम अतिशय सुंदर, स्वच्छ, उत्तमरीत्या करत होत्या. गुरांची खूप आवड होती. वयाच्या पंचाहत्तरीपर्यंत गोठ्यात वावरत होत्या. पावसात स्वतः जातीने लक्ष घालून परसू करत होत्या. मग ती वांगी असो वा तोंडली. माझे सासरे कै. श्री. लक्ष्मण पां. (बाबा मराठे) विश्व हिंदू परिषद, संघ, ब्राह्मण संघाचे कार्यकर्ते असल्यामुळे घरात राबता होता. पाच मुलांचा संसार सांभाळून त्यांनी सर्वांचे उत्तम आदरातिथ्य केले. येणारा प्रत्येक पै-पाहुणा त्यांच्याकडून कधीच रिक्त हातानी गेला नाही मग ते कुळाघरातील आंबे, केळी असो नाहीतर फणसाचे पापड. आमचं सासू-सुनेचं नातंही आंबट-गोड होतं. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नातींवर विशेष प्रेम होते. मग त्यांचे खाणे-पिणे असो नाहीतर चांगले संस्कार करणे. एक आदर्श कन्या, बहीण, पत्नी, आई, आजी हा प्रवास त्यांनी उत्तमरीत्या पार पाडला. अशा चौफेर व्यक्तिमत्त्वाच्या माझ्या सासूबाईंना ३ जुलै २०१९ रोजी अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली. कालाय तस्मैः नमः त्यांची उणीव आम्हा परिवाराला पदोपदी जाणवत राहीलच. पण श्री देव व्याडेश्वर आणि समस्त मराठे परिवार यांच्या आशीर्वादाने ती उणीव मी भरून काढायचा प्रयत्न करीन.

**सौ. अश्विनी अ. मराठे,** खोतोडे, वाळपई, गोवा.



## मानसन्मान

### अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण महासंघाच्या उपाध्यक्षपदी नंदकुमार मराठे (पृ. २१९) यांची निवड

अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची सभा कोल्हापूर येथे नुकतीच संपन्न झाली. श्री. माधव घुले यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. या सभेमध्ये कोल्हापुरातील चित्पावन ब्राह्मण संघाच्या महत्त्वपूर्ण कामाच्या यशप्राप्तीप्रित्यर्थ चित्पावन संघाचे अध्यक्ष नंदकुमार मराठे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करून राष्ट्रीय कार्यकारिणीने त्यांची उपाध्यक्षपदी निवड केली. या सभेमध्ये सतीश खरे (कल्याण) यांनी प्रास्ताविक केले. मनोज केळकर (मुंबई) यांनी आभार मानले. या सभेत राजन पटवर्धन (रत्नागिरी), अशोक बोडस (कराड), मिलिंद दाते (पंढरपूर), वासुदेव दिवेकर (सांगली), विजय आठवले (पुणे) आदी मान्यवर उपस्थित होते. सभेला महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आदी प्रांतातील प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. नंदकुमार मराठे हे महालक्ष्मी भक्त मंडळ धर्मशाळा, ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, कोल्हापूर चित्पावन संघ, करवीर नगर वाचनमंदिर आदी संस्थांवर संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या निवडीने सर्वत्र कौतुक होत आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. नंदकुमार मराठे यांचे हार्दिक अभिनंदन व कार्यासाठी शुभेच्छा!

**- प्रेषक : श्री. द.गो. कानिटकर**

# घरगुती गणेश सजावट स्पर्धा २०१९ - विजेते



श्री. उदय मराठे



कु. प्रांजली मराठे



श्री. दीपक मराठे

गेली चार वर्षे आपलं प्रतिष्ठान घरगुती गणेश सजावट स्पर्धा आयोजित करत आहे. यावर्षी प्रतिष्ठानचे सन्माननीय सदस्य व या विषयातील तीन जाणकार व्यक्तींनी स्पर्धेसाठी आलेल्या प्रवेशिकांचे परीक्षण केले. या वर्षी या बक्षिसांचे मानकरी आहेत

**१) प्रथम पारितोषिक : श्री. उदय मराठे, दुबई रु.१००१/-**

**२) द्वितीय पारितोषिक : कु. प्रांजली मराठे, डोंबिवली, रु.७५१/-**

**३) तृतीय पारितोषिक : श्री. दीपक मराठे, गोवा. रु.५०१/-**

परिक्षकांचे मनःपूर्वक आभार आणि विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन.

**मात्र प्रतिष्ठानच्या या व अशा प्रकारच्या इतर उपक्रमांमध्ये यापेक्षाही जास्त प्रतिसाद आपणाकडून अपेक्षित आहे.**

**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**